सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. ११ मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ३९ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## पाकिस्तानच्या गोळीबारात भारताच्या सरकारी अधिकाऱ्याचा मृत्यू



काश्मीर: पाकिस्तानच्या गोळीबारामध्ये सरकारी अधिकाऱ्याची मृत्यु झाल्याची माहिती समोर येत आहे. राजौरीमध्ये अति.जिल्हा विकास आयुक्त राज कुमार थापा यांचा मृत्यु झाला असल्याचे जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी ट्विट केलं आहे. ज्यात त्यांनी आपण जम्मू-काश्मीर प्रशासन सेवेतील एक समर्पित अधिकारी गमावला असल्याचं सांगत शोक व्यक्त केला आहे.

राजकुमार थापा हे जम्मू आणि काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यातील अतिरिक्त जिल्हा विकास आयुक्त (-ऊऊ) म्हणून कार्यरत होते. तसेच ते काश्मीरचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसोबतच्या बैठकीत देखील सहभागी झाले होते. राजकुमार थापा यांनी जिल्ह्यातील विविध विकास योजनांच्या अंमलबजावणीसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.

जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला ट्विट करत म्हणाले की, आज पाकिस्तानने राजौरी शहराला लक्ष्य केले. यात केलेल्या गोळीबारात अधिकाऱ्याच्या निवासस्थानावर हल्ला झाला, ज्यामध्ये आमचे अतिरिक्त जिल्हा विकास आयुक्त श्री. राजकुमार थप्पा यांचा मृत्यू झाला. या भयानक जीवितहानीबद्दल मला धक्का आणि दुःख व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत. त्यांच्या आत्म्याला शांती मिळो

१० मे २०२५ रोजी, राजौरी जिल्ह्यातील त्यांच्या अधिकृत निवासस्थानावर पाकिस्तानी सैन्याच्या गोळीबारात एक तोफगोळा लागल्यामुळे राजकुमार थापा यांचा मृत्यू झाला. या घटनेत त्यांचे दोन कर्मचारीही गंभीर जखमी झाले आहेत. शुक्रवारी रात्री पाकिस्तानने गुजरात, जम्मू आणि काश्मीर, राजस्थान आणि पंजाब या ४ राज्यांमधील २६ शहरांवर ड्रोन हल्ले केले. भारतीय लष्कराने पाकला जशास तसं उत्तर दिलं आहे.

# भारताचे आता मिशन DEAD सुरू; तर पाकिस्तान म्हणतो, 'आता शांती हवी!'

इस्लामाबाद : पाकिस्तानने भारतावर केलेल्या ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यांना जशास तसे प्रत्युत्तर मिळाल्यामुळे पाकिस्तानची बोलती बंद झाली आहे. भारताने केवळ पाकिस्तानच्या हल्ल्यांपासून फक्त संरक्षणाची रणनीती न अवलंबता नुकसान होईल, असे मोठे प्रतिहल्ले करण्यास सुरुवात झली आहे. त्यामुळे आता पाकिस्तान नरमताना दिसत आहे. पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री इशाक दार यांनी यासंर्भात महत्त्वाचे वक्तव्य केले आहे. आम्हाला युद्ध नको शांती हवी आहे, असे वक्तव्य इशाक दार (खीहर ॅऊी) यांनी केले आहे.

शांतता हवी आहे- इशाक दार

भारताने जर हल्ले थांबवले तर आम्हीसुद्धा हल्ले थांबवू. आम्हाला विनाश नको आहे, आम्हाला निधीचा अपव्यय नको. जर भारत थांबला तर आम्हीही थांबू.



पाकिस्तानला नेहमीच शांतता हवी होती. जर भारता या क्षणी थांबले तर आम्हीही शांततेचा विचार करू आणि बदला घेणार नाही किंवा काहीही करणार नाही. आम्हाला खरोखर शांतता हवी आहे, असे इशाक दार यांनी म्हटलंय. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर इशाक दार यांनी भारताविरोध वक्तव्य करुन वातावरण तापवले होते. मात्र, आता त्यांच इशाक दार यांनी, 'आम्हाला आता लढायचं नाही, भारत थांबला तर आम्ही थांबू', अशी भूमिका घेतल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

भारताने कारवाईचा गिअर बदलला

भारत आणि पाकिस्तानमध्ये गेल्या ४ दिवसांपासून हल्ले-प्रतिहल्ले सुरु आहेत. दोन्ही बाजूंनी एकमेकांवर तोफांनी, क्षेपणास्त्रांनी आणि ड्रोनने मारा केला जात आहे. भारताने सर्वप्रथम ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानातील दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले होते. त्यानंतर आता भारत टप्प्याटप्प्याने ही मोहीम पुढे नेत आहे. दुसऱ्या टप्प्यात पाकिस्तानने भारतावर हल्ला केला सैन्याने तेव्हा पाकिस्तानी ड्रोन आणि क्षेपणास्त्रं नष्ट करुन भारताने या हल्ल्याला सरप्रेस केले. त्यानंतरही शुक्रवारीही पाकिस्तानने पुन्हा हल्ला केला तेव्हा भारतीय सैन्याने फक्त 'सप्रेशन' स्ट्रॅटेजी न वापरता काऊंटर अटॅक केला. भारतीय सैन्याचे पहिले धोरण (सप्रेशन ऑफ एनिमी एअर डिफेन्स) म्हणजे सीड असे होते. आता भारताने डिस्ट्रक्शन ऑफ एनिमी एअर डिफेन्स धोरण वापरायला सुरुवात केली आहे. त्यामुळेच पाकिस्तानच्या कालच्या हल्ल्यानंतर भारताने प्रतिहल्ला करुन पाकिस्तानी सैन्याचे हवाई तळ उद्ध्वस्त केले आहेत.

पाकिस्तानने भारतावर पहिला हल्ला केला तेव्हा फक्त रक्षण करण्याचा पवित्रा होता. दुसऱ्या हल्ल्यानंतर पाकिस्तानातील लष्करी आस्थापनांना लक्ष्य करण्यात आले. त्यानंतर आता पाकिस्तानने पुन्हा हल्लास केल्यास ऑपरेशन सिंदूर ३ अंतर्गत आणखी मोठा हल्ला होण्याची दाट शक्यता आहे.

## ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर शिर्डीत हाय अलर्ट; मंदिर आणि विमानतळाच्या सुरक्षेचा आढावा

शिर्डी : ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर शिर्डीतील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे श्री साईबाबा मंदिर आणि साईबाबा आंतरराष्ट्रीय विमानतळाला सतर्कतेचे आदेश देण्यात आले आहेत. आज सायंकाळी अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे यांनी पोलीस अधिकाऱ्यांसह साईबाबा मंदिर आणि शिर्डी विमानतळ या दोन्ही ठिकाणी भेट देऊन सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला.

या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने, पोलीस निरीक्षक रणजित गलांडे आणि मंदिर सुरक्षा प्रमुख सतीश गोटेकर यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.मंदिराच्या परिसरातील सुरक्षा व्यवस्था अधिक सतर्क करण्यात आली असून, मंदिरात येणाऱ्या प्रत्येक भाविकांची तसेच स्थानिक नागरिकांची कसून तपासणी केली जात आहे.

परिसरात येणाऱ्या ग्रामस्थांची आणि मंदिरातील कर्मचाऱ्यांची ओळख पटवून त्यांची नोंद ठेवण्यात येत आहे. यासोबतच मंदिरात आणले जाणारे फूल आणि प्रसादाचे साहित्य देखील बारकाईने तपासले जात आहे. खबरदारीचा उपाय म्हणून, दिवसभरात अनेक वेळा बॉम्ब शोधक पथकाकडूनही मंदिराच्या परिसराची तपासणी केली जात आहे.




# पाकिस्तानकडून रुग्णालय व शाळांवर हल्ले- कर्नल कुरेशी

नवी दिल्ली : भारताने केवळ दहशतवादी तळांवर हल्ला करत संयम दाखवला, पण पाकिस्तानने मात्र आता युद्धाची सगळी नैतिकता फेकून दिली आहे. भारतीय लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले की, पाकिस्तानने भारतातील रुग्णालयं, शाळा आणि नागरिक रहात असलेल्या वस्ती भागांवर हल्ले चढवलेत. या पत्रकार परिषदेला परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी आणि विंग कमांडर व्योमिका सिंगही उपस्थित होते.

कर्नल कुरेशी म्हणाल्या, शुक्रवारी पाकिस्तानने श्रीनगर, अवंतीपुरा आणि उधमपूरमधील वैद्यकीय सुविधा टार्गेट केल्या. पंजाबमधील हवाई तळावर क्षेपणास्त्रांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला. हे फक्त युद्ध नाही तर ही मानवतेवर आघात करणारी हिंसा आहे! पाकिस्तानने भारताच्या सीमावर्ती भागात २६ पेक्षा जास्त वेळा हवाई घुसखोरीचा प्रयत्न केला. पठाणकोट, भूज, भटिंडा, उधमपूर येथील लष्करी ठिकाणांवर ड्रोन आणि लांब पल्ल्याची शस्त्रं वापरून केलेले हल्ले भारतीय जवानांनी मोठ्या धैर्याने परतवले. शनिवारच्या पहाटे १.४० वाजता पंजाबच्या हवाई तळाला हाय-स्पीड क्षेपणास्त्रांनी लक्ष्य केले गेले. त्याच वेळी श्रीनगरमध्येही पाक हवाई दलाने कारवाईचा प्रयत्न केला. पण भारतीय हवाई संरक्षण यंत्रणेने त्वरित चोख प्रत्युत्तर दिले.

परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी स्पष्ट सांगितले की, पाकिस्तान भारताच्या पायाभूत सुविधांचे नुकसान झाल्याचे खोटे दावे करत आहे. धार्मिक स्थळांवर क्षेपणास्त्र डागल्याचा दावा तर पूर्णपणे हास्यास्पद आहे.

दरम्यान, पाकिस्तानने आपले सैन्य सीमेकडे हलवायला सुरुवात केली असून, भारत यावर बारकाईने लक्ष ठेवून आहे. विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी सांगितले, भारत शांततेचा मार्ग राखू इच्छितो, पण जोडीला देशाच्या सुरक्षेचाही संपूर्ण बंदोबस्त केला आहे. योग्य वेळी, योग्य ती किंमत मोजली जाईल.

पाकिस्तानने आता जगासमोर स्वतःचा खरा चेहरा दाखवला आहे, जो केवळ दहशतवादाचा नव्हे, तर मानवताविरोधी कृत्यांचा आहे. भारत अशा प्रत्येक हालचालीला दहापट जोरात प्रत्युत्तर देईल, हे पाकिस्तानने लक्षात ठेवावे, अशा इशाराही मिसरी यांनी दिला आहे.

## भारताने मारलेल्या पाच कुरव्यात दहशतवाद्यांची नावं आली समोर

जम्मू काश्मीर: ७ मे रोजी पहाटे भारतीय सैन्याने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीर मध्ये खोलवर हवाई हल्ला केला तेव्हा ऑपरेशन सिंदूरच्या सुरुवातीच्या टप्प्यात पाकिस्तानस्थित दहशतवादी गट, जश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तोयबा यांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे पाच दहशतवादी ठार मारले गेले होते. त्या पाच दहशतवाद्यांची नावं आता समोर आली आहेत.

भारतीय लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर' द्वारे काश्मीर आणि पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवाद्यांचे तळ नेस्तनाबूत केले. या एअर स्ट्राइकमध्ये ज्या दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला, त्या दहशतवाद्यांवर पाकिस्तानने शासकीय अंत्यसंस्कार केले. अशा या पाच दहशतवाद्यांची नावं मुदस्सर खादियान खास, हाफिज मुहम्मद जमील, मोहम्मद युसूफ अझहर, खालिद उर्फ अबू आकाशा आणि मोहम्मद हसन खान अशी आहेत.

लष्करी गणवेशात या दहशतवाद्यांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित असलेल्या उच्च पाकिस्तानी अधिकाऱ्यांचे फोटो व्हायरल झाले होते, ज्यामुळे पाकिस्तानी सैन्य आणि दहशतवाद्यांमधील दशकांपूर्वीचे संबंध यामुळे संपूर्ण जगासमोर उघड झाले होते.

भारताने पाकिस्तानच्या ध्वजात लपेटलेल्या दहशतवाद्याचा ताबूत दाखवणारा फोटो जगासमोर सादर करत, पाकिस्तान जागतिक दहशतवादात सहभागी असल्याचा निर्विवाद पुरावा सादर केला.

मुदस्सर आणि अबू जुंदाल या नावांनी ओळखला जाणारा खास हा लष्कर-ए-तोयबाशी संबंधित होता. त्याच्याकडे भारताच्या सीमेपासून सुमारे २५ किमी अंतरावर असलेल्या पाकिस्तानातील मुरीदके येथील मरकझ तैयबा या दहशतवादी छावणीचा प्रमुख होता. ही छावणी लष्कर-ए-तोयबाचे मुख्यालय होते. २००८ च्या मुंबई हल्ल्यात जिवंत पकडलेला दहशतवादी अजमल कसाबने या छावणीत प्रशिक्षण घेतले होते. २६/११ मध्ये सहभागी असलेला आणखी एक दहशतवादी डेव्हिड हेडली यानेही येथे प्रशिक्षण घेतल्याचे वृत्त आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, खासचा अंत्यसंस्कार एका सरकारी शाळेत जागतिक दहशतवादी हाफिज अब्दुल रौफ याच्या नेतृत्वाखाली करण्यात आला. त्याच्या अंत्यसंस्काराच्या वेळी, पाकिस्तानी लष्कराने खासला गार्ड ऑफ ऑनर दिला आणि उच्च लष्करी अधिकाऱ्यांनी पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर आणि पंजाब प्रांताचे मुख्यमंत्री मरियम नवाज यांच्या वतीने पुष्पहार अर्पण केला. त्याच्या अंत्यसंस्काराला पाकिस्तानी लष्करातील लेफ्टनंट जनरल आणि पंजाब प्रांताच्या पोलिस महानिरीक्षक पदावरील एक अधिकारी उपस्थित होता.

जमील हा जैश-ए-मोहम्मद हा जैशचा संस्थापक मसूद अझहरचा मेहुणा होता. पाकिस्तानच्या आत सुमारे १०० किमी अंतरावर असलेल्या बहावलपूरमधील मरकझ सुभान अल्लाहचा तो प्रमुख होता.






## संक्षिप्त वृत्त...

### सोनपेठ तालुक्यातील आरोपी तीन वर्षे हद्दपार

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** येथील सोनपेठ पोलीस ठाणे हद्दीतील एका सराईत आरोपीला तीन जिल्ह्यांतून पुढील एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे. विविध प्रकारच्या गुन्ह्यातील सराईत आरोपी उत्तम मंचक पवार वय २४ वर्षे राहणार कोठाळा ता. सोनपेठ जिल्हा परभणी. यास मुंबई पोलीस अधिनियम कलम ५६ अन्वये परभणी, हिंगोली व जालना जिल्ह्यातून एक वर्षाकरिता हद्दपार केले आहे. या प्रकरणी सोनपेठ येथील पोलीस निरीक्षक सुर्यमोहन बोलमवाड यांनी सखोल तपास करुन पुढील कार्यवाही साठी उपविभागीय अधिकारी यांना कळवले होते. त्या अनुषंगाने पाथरी चे उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी आदेश पारित केला असून आरोपी उत्तम पवार यांस हद्दपार केले आहे.

### नंदू जमदाडे मृत्यू प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** नरळद येथे भीम जयंतीच्या दिवशी पोलिसांकडून झालेल्या मारहाणीत नंदु सुदामराव जमदाडे यांचा मृत्यु झाला. या प्रकरणाची सखोल चौकशी करावी या मागणीसाठी जमदाडे कुटुंबियांनी मानवत पोलीस ठाण्यासमोर आक्रोश व्यक्त केला.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते रामेश्वर बचाटे, सामाजिक कार्यकर्ते संजय सोनकांबळे, संजय जमदाडे, दिव्या जमदाडे (मयताची पत्नी), कारभारी पवळे, रमेश पाईकराव, विलास जमदाडे, प्रभाकर जमदाडे, सुरेश पंडित, बाळू पंडित, विद्याधर गायकवाड, दीपक पाईकराव, करण कांबळे, भास्कर जमदाडे, आकाश जमदाडे, बाबासाहेब आव्हाड, गणपत पवळे, नामदेव उपाडे, ॲड. पोटभरे, एकनाथ पंडित गालफाडे, संतोष इंगोले, स्वप्नील ब्रह्मराक्ष, सुनिता कांबळे, कविता पाईकराव, कोमल जमदाडे, गयाबाई जमदाडे आदीसह महिला उपस्थित होते.

### हमाल माथाडी कामगारांचे काम बंद आंदोलन सुरुच

#### मागणी पूर्ण होईपर्यंत माघार न घेण्याचा निर्धार

परभणी,/प्रतिनिधी : मराठवाडा हमाल माथाडी मजदूर युनियनच्या वतीने शहरातील जिंतूर रोडवरील शासकीय गोदामातील तसेच परभणी जिल्ह्यातील नोंदणीकृत हमाल माथाडी कामगारांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी २ मे पासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले असून गुरुवारी (दि.०८) दुपारी १ वाजेच्या सुमारास नायब तहसीलदार यांनी हमाल माथाडी कामगारांची भेट घेतली. यावेळी कामगारांनी जोपर्यंत थकीत २९ महिन्याची फरक बिलाची रक्कम मिळत नाही तोपर्यंत काम बंद आंदोलन सुरू राहणार असल्याचे सांगितले.

यावेळी मराठवाडा हमाल माथाडी मजदूर युनियन लाल बावटा संघटनेच्या ॲड. माधुरीताई क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष कॉम्रेड शेख अब्दुल, गोदाम मुकादम शेख शारेख, सय्यद रशीद, उत्तम बेले, शेख युनूस, अहेमद खान , सय्यद तुराब, शेख गौस, शेख सिकंदर, फेरोज चाऊस, शेख उस्मान, सय्यद समीर, शेख कलीम, शेख महेमुद आदींसह हमाल माथाडी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### स्वामी समर्थ मंदिरातील रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**परभणी,/प्रतिनिधी :** परमपूज्य मोरेदादा यांच्या पुण्यतिथी निमित्त तसेच देश संरक्षणासाठी लढणाऱ्या जवानांसाठी सिंचन नगरातील स्वामी समर्थ मंदिर येथील विश्वस्त मंडळाद्वारे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात मोठा प्रतिसाद मिळाला.

या केंद्रमार्फत वर्षातून अनेक उपक्रम राबविण्यात येतात. त्यामध्ये प्रामुख्याने स्वच्छता अभियानला जास्त महत्त्व आहे. रक्तदान शिबिरास परभणीच्या विविध भागातून पुरुष, महिला, तसेच सेवेकरी यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. पोले, डॉ. कालिदास चौधरी, डॉ. लखमावार, डॉ. भाग्यश्री मुंडे, दत्तात्रय देठणकर (दाजी), बाळासाहेब चौधरी, सुशील भैया देशमुख, श्याम आंबेकर, विजयकुमार काजबवार, चंदन सिंह परिहार, विठ्ठल भुसेवाड, प्रवीण कराळे, दत्ता बागल, राजेश कंठाळे, नरेश येरळकर, तसेच साक्षी राजेंद्र भताने यांनी प्रयत्न केले.

### जिंतूरात अतिक्रमण हटाव मोहीम सुरू

**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर येथील अण्णाभाऊ साठे पुतळा ते साखर तळा रोड पर्यंत शहरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झालेले असून हे अतिक्रमण काढण्यासाठी जिंतूर नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी मीनानाथ दंडवते यांनी पुढाकार घेतला आहे.

शहरातील अण्णाभाऊ साठे चौक ते साखरखेडा रोड पर्यंत अतिक्रमण अगदी तुरळकपणे असून हे रोड नगरपरिषदेच्या मालकीचे नव्हे तर सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या मालकीचे आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी डोळेझाकपणा केल्या असल्याने रोडच्या दोन्ही बाजूने हॉटेल्स, केस कर्तनालय, झेरॉक्स असे विविध व्यावसायिक धारकांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले आहे. बसस्थानक समोर जिल्हा परिषद प्रशाला यांच्याही मालकीच्या जागेवर या अतिक्रमणधारकांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले आहे. हे अतिक्रमण काढण्यासाठी मुख्याधिकारी मीनानाथ दंडवते प्रयत्न करीत होते. सार्वजनिक बांधकाम विभागाला अनेक पत्र त्यांनी दिली मात्र बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी काहीच प्रतिसाद दिला नाही. आमच्याकडे मॅन पॉवर नाही तुम्हीच ते अतिक्रमण काढा असे नवमुख्याधिकाऱ्याला सांगून बांधकाम विभागाधिकाऱ्यांनी अंग झटकले. शहरात अलाउंसिंग करून ठिकठिकाणी बोर्ड लावून अतिक्रमण काढून घेण्यासाठी अतिक्रमणधारकांना आवाहन मुख्याधिकाऱ्यांनी केले. गेल्या मंगळवारपासून नगरपरिषद कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन दंडवते यांनी रस्त्यावर उतरून जेसीबी लावून अतिक्रमण काढण्याची मोहीम सुरू केली.

दरवेळेस अतिक्रमण काढत असताना पोलिसांचा मोठा बंदोबस्त घेतला जात असे परंतु, यावेळी मुख्याधिकारी मीनानाथ दंडवते यांनी पोलीस बंदोबस्त घेतला नाही. शिवाय कर्मचाऱ्यांचा मोठा ताफाही सोबत घेतला नाही.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# पाथरी येथे उभारणार महात्मा जोतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक- जिल्हाधिकारी यांनी दिले आदेश

**मोहन धारासूरकर**

**पाथरी,/प्रतिनिधी-** पाथरी नगरपरिषद अंतर्गत माळीवाडा परिसरात क्रांतीसूर्य जोतिराव फुले व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी तसेच पाथरी , सोनपेठ, व मानवत येथील विविध विकासकामांसाठी जमिनीचे अधिग्रहण, मूल्यांकन तसेच नियामक आयोगाकडे प्रस्ताव पाठवण्याबाबत आ राजेश विटेकर यांनी जिल्हाधिकारी परभणी येथे आयोजित केलेल्या बैठकीत जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना त्याबाबत आदेश दिले आहेत.

पाथरी येथील माळीवाडा परिसरात क्रांतीसूर्य जोतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या भव्य स्मारक व सुशोभिकरासाठी ती जागा प्रस्तावित करण्यात आली आहे , सर्व प्रक्रिया पार पडल्यानंतर स्मारक उभारण्यासाठी सुरुवात होईल , याच ठिकाणी बहुउद्देशीय सामाजिक उभारण्यात येणार आहे, तर सोनपेठ येथे जायकवाडी वसाहत परिसरात भव्य क्रिडांगण उभारण्यात येणार आहे त्यासाठी सोनपेठ नगरपरिषदेने ३८ कोटी रुपयांची रक्कम जायकवाडी पाटबंधारे विभागाकडे जमा केली असून मंजुरीचा प्रस्ताव नियामक आयोगाकडे सादर करण्यात आला आहे अशी माहिती सोनपेठ येथील तहसीलदार कावखें यांनी बैठकीत दिली तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकिय मुलां-मुलींचे वसतिगृह उभारण्यासाठी शेळगाव किंवा दिघोळ येथील जमीन पाहण्यात येणार आहे जर जमीन मिळत नसेल तर आ राजेश विटेकर यांनी स्वतःच्या खर्चाने जमीन विकत घेऊन वस्तीगृहासाठी जमीन देणार असल्याचे या बैठकीत जिल्हाधिकारी यांना सांगितले तर पाथरी येथे मोठे क्रिडांगण , डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकिय मुलां-मुलींचे वस्तीगृह, नवीन प्रशासकीय इमारत तसेच भक्त निवास साठी पोहेटाकळी शिवारातील गट क्र.८३ मधील १७ एकर जमीन



निश्चित करण्याचे यावेळी ठरले असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी व तहसीलदार हांडेश्वर यांनी बैठकीत दिली, त्याची पाहणी, मोजणी व मूल्यांकन काढण्याबाबत कार्यकारी अभियंता पाटबंधारे प्रसाद लांब, मुद्रांक जिल्हाधिकारी , तसेच जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांना जिल्हाधिकारी यांनी आदेश दिले सदरील प्रस्ताव तयार झाल्यावर नियामक आयोगाकडे सादर करण्यात येणार आहे, सोबतच पाथरी येथील नवीन उपविभागीय अधिकारी कार्यालय व निवासस्थान बांधकाम करण्या साठी पाथरी येथील गट क्र. ०८ मधील १ हेक्टर जागा यांची निश्चितता करण्यात आली परंतु त्याचे मूल्यांकन जास्तीचे आलेले असल्याने त्याचे फेर मूल्यांकन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी यावेळी दिल्या.

मानवत येथे भव्य क्रिडांगण उभारण्यासाठी मानवत नगरपरिषदेने पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याची तयारी केलेली आहे ते लक्षात घेऊन रत्नापूर शिवारातील गट क्र. ३ व ५ मधील १३ एकर जागेची मोजणी व मूल्यांकन करण्याबाबतच्या सूचना तहसीलदार पांडुरंग माचे वाढ , मुख्याधिकारी कोमल सावरे यांना जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी दिल्या आहेत.

जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वरील सर्व जमिनी विकासकामांसाठी हस्तांतरित करण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला असून पुढील आठवड्यात त्याबाबत मंत्री महोदय सोबत बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती आ राजेश विटेकर यांनी बैठकीत दिली, त्यापूर्वी हे प्रस्ताव मंत्रालय स्तरावर सादर करण्यात येणार आहेत.

या बैठकीस आ राजेश विटेकर, डॉ अंकुश लाड, पंकज आंबेगावकर, रामभाऊ अरगडे , यांच्या सह जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, दिपा गुट्टे सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त, सार्वजनिक बांधकाम विभागाने कार्यकारी अभियंता पाटील, जायकवाडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद लांब, जिल्हा प्रशासन अधिकारी प्रदीप जगताप, तहसीलदार सर्वश्री कावरखे,माचेवाढ, हांडेश्वर, मुख्याधिकारी कोमल सावरे, पिंपळकर जिल्हा भूमिलेख अधिकारी , सहाय्यक निबंधक, मोजणी अधिकारी जायकवाडी पाटबंधारे विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता असे जवळपास ३५ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## आर.पी.हॉस्पीटल येथील डॉक्टरांच्या प्रयत्नाला यश

### ९ वर्षाच्या बालकाचे वाचविले प्राण, डॉक्टरांच्या कामगिरीचे कौतूक

**परभणी,/प्रतिनिधी :** खेळताना बॅट लागल्याने डोक्याला गंभीर दुखापत झालेल्या ९ वर्षीय बालकावर परभणी येथील आर.पी. हॉस्पिटल एंड रिसर्च इंस्टिट्यूट येथे यशस्वी मेंदू ची शस्त्रक्रिया करून त्याला जीवनदान देण्यात आले. येथील डॉक्टरांनी केलेल्या प्रयत्नाला यश आले आणि बालकाला नवे जीवन मिळाले.

आपल्या मित्रासोबत खेळताना बैट जोराने डोक्याला लागली आणि या बालकाला उलट्या आणि डोकेदुखीचा त्रास सुरू झाल्याने त्याला तात्काळ आर.पी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. प्राथमिक तपासणीत शल्यचिकित्सक डॉ. आमेर खान यांनी बालकाची पाहणी केली. सिटीस्कॅनच्या अहवालात कवटीच्या हाडाचे तुकडे झाल्याचे निष्पन्न झाले. यामुळे सदरील हाडाचे तुकडे मेंदूवरील आवरणास इजा पोहचवत असल्याचे आढळले आणि हे तुकडे मेंदूला इजा करण्यापूर्वी तात्काळ शस्त्रक्रियेची गरज असल्याचे स्पष्ट झाले. हॉस्पिटलमधील प्रसिद्ध न्यूरो सर्जन डॉ. दत्तात्रय किरडे यांनी बालकाची तपासणी करून तात्काळ शस्त्रक्रिया केली. या अवघड शस्त्रक्रियेत डॉ. आमीर तडवी, डॉ श्रीकांत वांगीकर,डॉ. उर्वशी, डॉ.शिवानी नाईक यांच्यासह संध्या आळने, किशोर नवले आणि पवन लोंढे यांच्या टीमने महत्त्वपूर्ण सहभाग नोंदवत ही शस्त्रक्रिया यशस्वी केली. न्यूरो सर्जन डॉ. दत्तात्रय किरडे यांनी ऑपरेशन नंतर सांगितले की ''बालकाच्या मेंदूच्या आवरणाला गंभीर इजा झाली होती, ज्यामुळे तात्काळ शस्त्रक्रिया आवश्यक होती. आमच्या टीमने तंत्रज्ञान आणि अनुभवाचा वापर करून ही आव्हानात्मक शस्त्रक्रिया यशस्वी केली व कवटीचे हाडाचे सर्व तुकडे काढून व मेंदूचे आवरण पूर्ववत केले



आहे. बालकाचा मेंदू आता सुरक्षित असून, त्याच्या जीवाचा धोका आता टळलेला आहे, त्याची प्रकृती स्थिर आहे,असे डॉ.किरडे यांनी सांगितले.यावेळी आर.पी.हॉस्पिटलचे प्रमुख आ.डॉ. राहुल पाटील यांनी सांगितले की आर.पी.हॉस्पिटल नेहमीच रुग्णसेवेसाठी कटिबद्ध आहे. या बालकावर यशस्वी शस्त्रक्रिया होणे हे आमच्या वैद्यकीय टीमच्या समर्पण आणि सुसज्ज सुविधांचे यश आहे. रुग्णाला नवजीवन मिळाले याचा आम्हाला अभिमान आहे,'' असे डॉ. पाटील म्हणाले. आर.पी.हॉस्पिटलने अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमद्वारे परभणीत उच्च दर्जाची आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली आहे. या बालकावरील यशस्वी शस्त्रक्रिया आमच्या हॉस्पिटलच्या क्षमतेचा पुरावा आहे. आम्ही यापुढेही रुग्णांना सर्वोत्तम उपचार देण्यासाठी कटिबद्ध आहोत,'' असे आर.पी.हॉस्पिटल चे अधिष्ठाता डॉ. शिंदे यांनी नमूद केले. ''आमच्या मुलाला नवे आयुष्य देण्यासाठी आम्ही आर. पी. हॉस्पिटलच्या संपूर्ण टीमचे, विशेषतः आमदार डॉ. राहुल पाटील, अधिष्ठाता डॉ. प्रमोद शिंदे, डॉ.दत्तात्रय किरडे, डॉ. आमीर खान आणि इतर डॉक्टरांचे मनापासून आभार मानतो हॉस्पिटलच्या २४ तास उपलब्ध वैद्यकीय सेवेमुळे आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या प्रयत्नांमुळे आमच्या मुलाचे प्राण वाचले,'' असे नातेवाइकांनी भावूक होत सांगितले. परभणीत आता अशा शस्त्रक्रियांची सुविधा: ही शस्त्रक्रिया प्रामुख्याने पुणे, मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्येच होत असे. परंतु, आता परभणी येथील आर पी हॉस्पिटलच्या सुसज्ज सुविधा आणि तज्ज्ञ वैद्यकीय टीममुळे अशा अवघड शस्त्रक्रिया येथेही यशस्वीपणे होऊ शकतात. यामुळे परभणी आणि आजूबाजूच्या परिसरातील रुग्णांना मोठ्या शहरांमध्ये जाण्याची गरज भासणार नाही. आर पी हॉस्पिटलच्या या यशामुळे अनेकांना नवजीवन मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते आज पाथरीत विविध विकास कामांचे भुमिपूजन होणार

**पाथरी,/प्रतिनिधी :** पाथरी येथील विविध विकास कामांचे



भुमिपूजन करण्याकरिता आज दि.११ मे २०२५ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उपस्थिती राहणार असून या विकास कामाच्या ठिकाणी पोलिसांच्यावतीने चोख असा बंदोबस्त तैनात करण्यात आला असल्याची माहिती यावेळी सईद खान यांनी दिली.

पाथरी येथील विविध विकास कामांचे भुमिपूजन करण्याचे ठरले होते. त्यानुसार राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनाप्रमुख एकनाथ शिंदे आणि त्यांचे सुपुत्र खासदार श्रीकांत शिंदे आणि सोबत येत असलेल्या मान्यवरांच्या स्वागतासाठी साईबाबाची पाथरी नगरी सज्ज झाली आहे. या निमित्ताने होत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज भूमिपूजन सोहळा,जनाजा हॉल शुभारंभ,श्रीराम मंदिर विकास काम उद्घाटन, साईबाबा मुख्य रस्त्यांचे भूमिपूजन आणि शेवटी शिवसेना मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष सईद खान यांच्या वतीने देण्यात आली होती.या कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू करण्यात आली असून,शिवसेना नेते सईद खान व त्यांचे बंधू असेफ खान याकडे जातीने लक्ष देत आहेत.जिल्ह्यातील सर्व शिवसैनिकांनी आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या लाडक्या बहिणींनी कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात उपस्थिती राहण्याचे आव्हान शेवटी सईद खान यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### सेलूत बालाजी मंदिरात सामुहिक प्रार्थना



**सेलू-** पहलगाम येथील दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारतीय लष्कराकडून ''ऑपरेशन सिंदूर'' राबवले जात आहे, त्याला पाठींबा देण्यासाठी , लष्करी मोहिमेच्या यशस्वीते साठी तसेच राष्ट्रीय ऐक्य, देशाचे सार्वभौमत्व, अखंडत्व आणि देशाच्या संरक्षणासाठी सिमेवर लढा देणाऱ्या भारतीय सेना दलाच्या विजयासाठी येथील बालाजी मंदिरात शुक्रवार दिनांक ९ मे रोजी सामुहिक प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले होते.

या सामूहिक प्रार्थनेसाठी शहरातील युवक- युवती, महिला, जेष्ठनागरीक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या वेळी सामुहिक हणुमान चालीसा, रामरक्षा स्तोत्र पठण व प्रार्थना घेण्यात आली. देशाच्या संरक्षणा साठी सिमेवर लढणाऱ्या प्रत्येक विर जवानांना प्रार्थनेच्या माध्यमातून मनोधैर्य व आत्मबल वाढावे,तसेच सर्व नागरिकांनी शांतता, संयम बाळगावा,एकजुटीने राहावे, अफवांवर विश्वास ठेवू नये, अफवा पसरवू नये, धार्मिक सलोखा व सामंजस्याचे पालन करावे शासनाच्या आवाहना नुसार प्रत्येक नागरिकांनी आपल्या कर्तव्याचे पालत करावे , मातृभूमिच्या रक्षणासाठी सिमेवर लढणाऱ्या सैन्यावर पूर्ण विश्वास ठेवावा असे आवाहन करण्यात आले.

### जिल्हाधिकारी यांनी केली सुट्टी रद्द

**परभणी-** शहरासह जिल्हाभरातील शासकीय सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांना भारत-पाकिस्तान युध्दाच्या पार्श्वभुमीवर आपत्तीकालीन परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वांचा सुटटी रद्दकरण्यात आल्याचे परिपत्रक काढले.

## जिंतूर येथेही श्री वासवी माता जन्मोत्सव निमित्त महापुजन

### महासभेच्या आवाहनानुसार संपूर्ण राज्यात वासवी मातेचा जन्मोत्सव

**जिंतूर ,/प्रतिनिधी-** आर्य वैश्य समाजाची कुलस्वामिनी वासवी कन्यका परमेश्वरी मातेचा जन्मोत्सव निमित्त जिंतूर शहरातील श्री नगरेश्वर मंदिरात महापूजन करण्यात आले दरम्यान मराठवाडा विदर्भासह संपूर्ण राज्यात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

जिंतूर येथील श्री नगरेश्वर मंदिरात समाज बांधवांच्या उपस्तितीत महापूजन झाले या वेळी समाज बांधव महिला भगिनीं उपस्थित होत्या तर महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या आवाहनानुसार राज्यात वासवी कन्यका परमेश्वरी मातेचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला वासवी माता पुराण, ग्रंथ वाचन, पारायण,भव्य शोभायात्रा, महा आरती, महाप्रसाद आदी कार्यक्रम घेण्यात आले. विशेष म्हणजे वासवी कन्यका परमेश्वरी मातेच्या जन्मस्थळावर विश्वस्त म्हणून महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार यांची निवड झाल्यानंतर आर्य वैश्य समाजाचा आनंद द्विगुणीत झाला. विशेषतः महिला भगिनींचा मोठा उत्साह राहिला. प्रत्येक ठिकाणी महिलांनी कुंकूमार्चन केले. काही ठिकाणी विश्वशांतीसाठी विष्णुसहस्रनामाचा पाठ घेण्यात आला संपूर्ण राज्यात महासभेने केलेल्या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार, महासचिव गोविंदराव बिडवई



,कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर महाजन, संघटन प्रमुख प्रदीप कोकडवार, बांधकाम समितीचे अध्यक्ष सूर्यकांत शिरपेवार, कार्याध्यक्ष सुमित रुद्रवार, सचिव सदानंद मेडेवार यांच्यासह महासभेची संपूर्ण टीम, महिला महासभा पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा २२ जिल्ह्यात कार्यान्वित आहे. महिला पदाधिकारी देखील सक्रिय झाले आहेत. महाराष्ट्र आर्य वैश्य महासभेच्या वतीने संपूर्ण राज्यात विविध उपक्रम राबविले जातात.

तळागाळातील समाज बांधवांना न्याय मिळवून देण्यासाठी महासभा सदैव तत्पर असल्याचे अभिवचन महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार व महासचिव गोविंदराव बिडवई यांनी दिले आहे. तर जिंतूर शहरात महापूजन साठी किरण वट्टमवार पुरुषोत्तम चिद्रवार वसंत कोकडवार दिलीप चिद्र वार सुनिल वट्टमवार यांच्यासह अनेक समाज बांधव हजर होते .

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# लग्नाचे अमिष दाखवून पिडितेवर केला अत्याचार !

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.१० मे – तालुक्यातील कळंकी येथील मुकेश केरु जाधव या २५ वर्षीय तरुणाने नाशिक शहरातील एका २३ वर्षीय तरुणीला लग्नाचे अमिष दाखवून बलात्कार केल्याचा प्रकार दि. १४ व २५ एप्रिल रोजी घडला. या प्रकरणी पिडीतेने दिलेल्या फिर्यादीवरून ग्रामीण पोलीस ठाण्यात मुकेश जाधव यांच्या विरुध्द दि ९ मे शुक्रवार रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत पोलिस सूत्रांनी दिलेली अधिक माहिती अशी की पिडीत तरुणी हि नाशिक शहरात भाड्याने खोली घेऊन राहते. पिडीता व आरोपी हे नातेवाईक आहे. त्यांची एकमेकांशी ओळख असल्याने आरोपी हा पिडीतेस कळंकी येथे बोलवुन तिला लग्नाचे आमिष दाखवुन कळंकी शिवारात असलेल्या एका ऊसाच्या शेतात नेवुन पिडीतेच्या इच्छे विरुध्द बळजबरीने वेळोवेळी शारिरीक संबंध प्रस्तापीत केले. पिडीतेच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद करण्यात आला असुन अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक डॉ.रामचंद्र पवार करत आहे.

## आधुनिक कुटुंबांसाठी वेईकल डिझाइन

नवी दिल्ली: किया इंडिया या आघाडीच्या मास-प्रीमियम कारमेकरने कॅरेन्स पोर्टफोलिओमधील नवीन कार 'कॅरेन्स क्लॅव्हिस'च्या लाँचची घोषणा केली आहे. ही बिग, बोल्ड आणि स्पेसिअस ३-रो (तिसऱ्या रांगेतील सीटमध्ये ऐसपैस जागा) वेईकल आहे. 'क्लॅव्हिस' नाव लॅटिन वाक्य क्लॅव्हिस ऑरियामधून घेण्यात आले आहे, ज्याचा अर्थ 'गोल्डन की' असा होतो. ही वेईकल संस्मरणीय कौटुंबिक साहसी ड्रायव्हिंगचा आनंद देते, तसेच उत्साहपूर्ण आठवणींसाठी गेटवे आहे. कॅरेन्स क्लॅव्हिस ऑफर करत असलेल्या या वेईकलमधून आधुनिक काळातील कुटुंबांच्या महत्त्वाकांक्षा दिसून येतात. या वेईकलमध्ये माहितीपूर्ण वैशिष्ट्ये, आकर्षक डिझाइन आणि सर्वोत्तम जागतिक तंत्रज्ञान आहे.

## सोयगाव येथे महाराणा प्रतापसिंह यांची जयंती साजरी



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१० मे

येथील बसस्थानक परिसरातील शिवामृत दूध डेरी अँड कोल्ड्रिंक्स सोयगाव येथे महाराणा प्रताप सिंह यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी सोयगाव शिवसेना तालुकाप्रमुख दिलीप मंचे (ठाकरे गट)यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी दिलीप मंचे,गोकुळ परदेशी,पंकज परदेशी यांच्याहस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी व्यापारी बंधू, पत्रकार, सह प्रमुख अतिथी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## शिवसेना भवन सोयगाव येथे वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांची जयंती साजरी



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१० मे

सोयगाव येथील शिवसेना भवन,माजी मंत्री,आमदार अब्दुल सत्तार यांच्या संपर्क कार्यालयात दि.९ शुक्रवार रोजी वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेच फुलहार अर्पण करून पुजन करण्यात आले. यावेळी सोयगाव शिवसेना तालुका प्रमुख धरमसिंग चव्हाण,युवासेना तालुका प्रमुख कुणाल राजपुत, नगरपंचायत गटनेता अक्षय काळे,माजी जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव,नगरसेवक संतोष बोडखे, नगरसेवक राजु दुतोंडे,नगरसेवक कदीर शहा,नगरसेवक हर्षल काळे,शेख जावेद,जिवण पाटील,दिलीप देसाई, सामाजिक कार्यकर्ता श्रावण राठोड,हर्षल देशमुख,समाधान काळे,अविनाश पाटील,डॉ.वसंत चव्हाण,विशाल चव्हाण,भारत तायडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ज्ञानयज्ञात मनाचे मनपण संपून जाते : प्रा. कुलकर्णी

## 'घरोघरी ज्ञानेश्वरी अमृतयोग' कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

ज्ञानयज्ञ हा सर्व यज्ञांमध्ये श्रेष्ठ आहे. कारण सर्वप्रकारची कर्मे ज्ञानामध्ये समाप्त होतात. म्हणजे कोणतेही कर्म करत असताना त्याच्यापासून काही तरी फलप्राप्ती व्हावी ही इच्छाच मनाला होत नाही. थोडक्यात ज्ञानयज्ञात मनाचं मनपणच संपून जाते, असे विचार प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) यांनी मांडले. साधता संवाद 'घरोघरी ज्ञानेश्वरी अमृतयोगच्या चौथ्या उपक्रमप्रसंगी ते बोलत होते. त्यांनी कर्म,अकर्म व विकर्म याविषयी सविस्तर विवेचन केले

'साधता संवाद घरोघरी ज्ञानेश्वरी वाचन' अमृतयोग या उपक्रमाचा चौथा कार्यक्रम आनंद गुंजकर यांच्या निवासस्थानी घेण्यात आला. घरात प्रवेश करताच अंगणात रांगोळीने साकारलेलं माऊलींचे सुंदर चित्र व फुलांनी काढलेली विठ्ठल-रूख्माईची मूर्ती लक्ष वेधून घेत होती. गुंजकर दाम्पत्याने वे.शा.स. भागवताचार्य अनंत महाराज पाथरीकर आणि प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) यांचे मनोभावे पाद्यपूजन केले.

माऊली भक्तांचे गुलाब पुष्पाने स्वागत केले. गुंजकर यांनी माऊलींच्या प्रतिमेचे विधिवत पूजन केले. त्यानंतर व्यवस्थापक बेंडे यांनी प्रास्ताविक करून यजमान गुंजकर व पाथरीकर महाराज यांचा परिचय करून दिला. अशोक पिंगळे यांनी चौथ्या अध्यायातील ३०० ओव्यांचे वाचन केले.

वेशासं लक्ष्मीकांत पाथरीकर महाराजांनी म्हणाले, भगवान श्रीकृष्णाने केवळ अर्जुनाचाच विषाद दूर केला नाही तर आज आपल्या सर्वांच्याच मनात अनेक प्रकारचे कन्फ्युजन चालू आहे. नव्हे आपले जगणेच एक कन्फ्युजन झाले, ते कन्फ्युजन दूर केले आहे. पाथरीकर महाराजांची रसाळ वणी सर्व माऊली भक्त एकाग्रतेने ऐकत होते. आनंद गुंजकर यांनी सर्वांचे आभार मानले. गुंजकर यांच्या हस्ते माऊलींची आरती करण्यात आली. सूत्रसंचलन मंगला चौरे यांनी केले. पसायदानाने सांगता झाली.

# नाथसागर जलाशयावर ४ हॅन्डग्रेनेट डिफ्युज, मॉकड्रिल संपन्न



तभा वृत्तसेवा

पैठण दि १० :- अवघ्या मराठवाड्याची जलसंजीवणी असणाऱ्या १०० टीएमसीच्या नाथसागर जलाशयावर (जायकवाडी धरण) हिंदुस्थान आणि पाकिस्तान यांच्यात संभावित युद्ध पाहता पोलिसांच्या वतीने शनिवारी सायंकाळी मॉकड्रिल घेण्यात आले. यावेळी धरण परिसरातून ४ डमी आतंकवाद्यांना ताब्यात घेऊन त्यांनी चार जागी ठेवलेल्या हॅन्डग्रेनेट बॉम्ब डिफ्युज करण्यात आले.

या मॉकड्रिल मध्ये एटीएस पथक,,पैठण पोलीस स्टेशन, उपविभागीय पोलीस कार्यालय, दंगा काबू पथक, जलद कृती दल,बॉम्ब शोधक पथक, डॉग स्कॉड, मेडिकल टीम, अग्निशमन विभाग,जायकवाडी धरण प्रशासन आदी विभागाचे १०० च्या वर सदस्यांनी सहभाग घेतला.अगोदर धरण परिसरात ४ डमी आतंकवादी पाठवण्यात आले. ज्यांनी २७ गेट परिसर,जल बिजली केंद्र, मुख्य प्रवेश द्वार परिसर आणि जांभुळबन या ४ ठिकाणी ४ हॅन्ड ग्रेनेट बॉम्ब ठेवले.ही माहिती धरण नियंत्रण कक्षातून पैठण पोलिसांना मिळताच पथकाच्या वतीने दहशतवादिंचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेण्यात आले. तसेच वरील चार ठिकाणी ठेवलेले हॅन्ड ग्रेनेट बॉम्ब डिफ्युज करण्यात आले.मॉलड्रिल मध्ये तहसीलदार दिनेश झांपले उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ सिद्धेश्वर भोरे, पोलीस निरीक्षक संजय देशमुख, जायकवाडी धरण कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव,,नायब तहसीलदार राहुल बनसोड, उप अभियंता गणेश खराडकर सह एटीएस पथक, जलद कृती दल,दंगा काबू पथक, बॉम्ब शोधक पथक, डॉगस्कॉड,मेडिकल पथक, अग्निशमन पथक सह विविध विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी यांचा सहभाग होता.

## जाहीर प्रगटन

**मा. ए. आइ. आवटी मॅडम, सह दिवानी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

किरकोळ अर्ज क्रमांकः २४१/२०२५
पु. तारीखः १७/६/२०२५

अर्जदारः १- इंदुबाई भ्र. कारभारी गायकवाड, वय-६७, वर्षे, धंदा- काही नाही, २- संजय भ्र. कारभारी गायकवाड, वय ४८, वर्षे, धंदा- शेतमजुरी, ३- शाईनाथ पि. कारभारी गायकवाड वय-४२, धंदा-शेतमजुरी ४- जगन्नाथ पि. कारभारी गायकवाड वय-४४, धंदा-शेतमजुरी, अर्जदार क्र. १ ते ४ सर्व रा. घुसुर ता. कन्नड, जि. औरंगाबाद ५ - मंगल भ्र. राजेंद्र पवार वय-४०, धंदा-घरकाम, रा. मनेगाव ता. वैजापुर जि. औरंगाबाद

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर, जि. छ. संभाजीनगर

अर्ज : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

तमाम जणतेस सुचित करण्यात येते की, ज्या अर्थी अर्जदार यांचे वकिल ॲड. एस. ई. धनेधर यांच्या मार्फत अर्जदाराने या न्यायालयात वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार २ ते ५ यांचे वडील नामे कारभारी शेषराव गायकवाड हे दिनांक-७/२/२०२५ रोजी मौजे घुसुर ता. कन्नड येथे मयत झाले असुन त्यांचा अंत्यविधी मौजे घुसुर येथे करण्यात आला आहे. अर्जा सोबत ग्रामपंचायत घुसुर ता. कन्नड यांचे कडील मयताचे प्रमाण पत्र दाखल केले आहे. मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला घेण्यासाठी अर्जदारास वारसप्रमाण पत्राची आवश्यकता आहे. व मयतास अर्जदारा व्यतिरीक्त ईतर कोणीही वारस नाही त्यामुळे अर्जदार मयताच्या वारसप्रमाण पत्राची न्यायालयात मागणी करीत आहे.

ज्या अर्थी सदरहु जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत होवुन मिळण्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे. सबब या जाहीर प्रगटनाद्वारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पूर्वी ईतर कोणाचाही आक्षेप उजर असल्यास सदर जाहीर प्रगटण वर्तमाण पत्रात प्रकाशित झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीशा किवा रीतसर वकिला मार्फत आवश्यक कागदपत्रासह आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयताचे कायदेशिर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक २८/४/२०२५ रोजी माझे सही निशी व मा. न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

दिनांकी २८/४/२०२५

आदेशावरुन

लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिठ स्तर कन्नड, यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र. २६१/२०२५
पुढील तारीख १४/०७/२०२५.

अर्जदार : १. युसूफ चांद खान, वय ५९ वर्षे, धंदा व्यापार, रा. नितीन नगर, कत्रड ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. यूनुस चांदखा पठाण, वय ५३ वर्षे, धंदा मजुरी, रा. महेताब नगर, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. आसीफ खान चांद खान पठाण, वय ४७ वर्षे. धंदा मजुरी, रा. गारका बंगला, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४. अजीजा अ. चांद खान, वय ७९ वर्षे, धंदा घरकाम, रा. गारका बंगला, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार -महाराष्ट्र शासन व्दारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. ए.ए. शेख यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, मयत चाँद रहीम खान हे मुळचे गार का बंगला, कन्नड ता. कन्नड येथील रहिवाशी होते. त्यांना अर्जदार क्र. १ ते ३ हे मुले असून अर्जदार क्र. ४ ही पत्नी आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे आपसात सख्खे भाऊ असून अर्जदार क्र. ४ ही त्याची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत चाँद रहीम खान यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र. १ ते ३ चे वडील व अर्जदार क्र. ४ चे पती नामे चाँद रहीम खान हे दि.११/०९/२०२२ रोजी मौजे कन्नड येथे वृद्धपकाळामुळे मरण पावले आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांना मयत चाँद रहीम खान यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे व मयत चाँद रहीम खान हे मौजे कन्नड ता. कन्नड येथील मुळचे रहिवाशी होते. सदरील मयतास अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.२०/०४/२०२५ रोजी मौजे कन्नड ता. कनड येथे घडले. अर्जदारांनी यापुर्वी अशा प्रकारचा वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज यापुर्वी इतर कोणत्याही न्यायालयात दाखल केलेला नाही अथवा न्याय प्रविष्ठ नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप बगैर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वर्गर मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याचची नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/०५/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक | सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.एन. काटकर मॅडम, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख : १२/०६/२०२५
दि.कि.अर्ज क्र. २५७/२०२५

अर्जदार : १ चंद्रकला भ्र. कारभारी रिड्डे, वयः ७३ वर्षे, धंदाः घरकाम, रा. चापानेर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद, २. नामदेव पिता कारभारी रिडे, वयः ५० वर्षे, धंदाः शेती, रा. चापानेर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. रंजना भ्र. सुभाष राशनकर, वयः ४४ वर्षे, धंदाः घरकाम, रा. जिल्हा परिषद शाळेजवळ, मु. जोगेश्वरी, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद. ४. लताबाई उर्फ चंदना अशोक कैतके, वयः ४६ वर्षे, धंदाः घरकाम, रा. कोळघर, ता. वैजापुर, जि. औरंगाबाद. ५ इंदीराबाई भ्र. ज्ञानेश्वर कैतके, वयः ४२ वर्षे, धंदाः घरकाम, रा. कोळघर, ता. वैजापुर, जि. औरंगाबाद. ६. सुनिता भ्र. अशाक रिष्ठे, वयः ४३ वर्षे, धंदाः घरकाम, रा. चापानेर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार – महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. व्ही. के. मोहिते यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील व अर्जदार क्र. ६ यांचे सासरे नामे कारभारी भिमा रिड्ढे हे दि. ०९/०१/२०२४ रोजी मौजे चापानेर, ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र. ६ चे पती, अर्जदार क्र. १ चा मुलगा व अर्जदार क्र. २ ते ५ यंचा भाऊ नामे अशांक कारभारी रिड्ढे हे दि. १६/१०/२०२२ रोजी मौजे चापानेर, ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मयतांचे मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत कारभारी भिमा रिड्ढे व अशोक कारभारी रिड्डे यांना अर्जदार क्र. १ ते ६ हेच कायदेशीर वारस असून इतर कोणीही वारस नाही अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि०६/०५/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क.स्तर कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती ए आय. आवटी, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कत्रड यांचे न्यायालयातून**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक २५९/२०२५
पुढील तारीख २०/६/२०२५

अर्जदार :१- अविनाश पिता नामदेवराव निकम, वय ४९ वर्षे, धंदा शेती, रा. उंबरखेडा, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर २-सरोजाबाई भ्र. नामदेव निकम, वय ७० वर्षे, धंदा शेती, रा. उंबरखेडा, ना. कब्रड, जिल्हा छ. संभाजीनगर ३-सुहास पिता नामदेव निकम, वय ४७ वर्षे, धंदा शेती, रा. उंबरखेडा, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर ४-अलका भ्र. रावसाहेब मनगटे, वय ५५ वर्षे, धंदा शेती, रा. वाकद, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर ५- वंदना भ्र. राजेंद्र जाधव, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. पिशोर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर ६-रोहिणी उर्फ करुणा भ्र. गणेश साळवे, वय ४१ वर्षे, धंदा शेती, रा. लोहगांव, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर

- विरुध्द-

गैरअर्जदार - महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद /छत्रपती संभाजीनगर

अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत..

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. डी. डी. जोशी, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे रहीवाशी असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून विदयमान न्यायालयान दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक २ चे पती व अर्जदार १,३ ते ६ यांचे वडील नामे नामदेव श्रीपत निकम हे. दिनांक १.२.२०२५ रोजी मेडीकव्हर हॉस्पीटल, छ. संभाजीनगर औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. व त्यांचा अंत्य संस्कार त्यांच्या राहत्या घरी मौजे उंबरखेडा ता. कन्नड येथे करण्यात आलेला आहे. सोबत महानगर पालिका, झोन नंबर ५ एन-५. सिडको छ. संभाजीनगर यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. मयताच्या नावे भविष्यात शासकीय निमशासकीय मिळणारे फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करणेस कारण दिनांक २३.०४.२०२५ रोजी घडले आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारम असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी इंतर कुणासही आक्षेप उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर ग्रस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक २९.०४.२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दि

दिनांक : २९.०४.२०२५

लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कत्रड

## आपापसात वाद मिटविणे महत्वाचे : न्यायाधीश अंजू शेंडे

अहिल्यानगर, ता. १०: प्रत्येकाला आपले हक्क मिळावे, यासाठी न्यायाची स्थापना झाली. आपले अधिकार मिळविण्यासाठी आपण न्यायालयात येतो, अधिकारांना मिळविण्यासाठी आपआपसातले वाद सामंजस्याने मिटवू शकतो. चांगला समाज तयार करण्यासाठी आपण चांगली वृत्ती आणि नको असलेली प्रकरणे काढण्याची तयारी ठेवावी. लोकन्यायालयामध्ये प्रकरणे सामजस्यांने मिटविण्याचे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहमदनगर बार आणि सेंट्रल बार असोशिएशन, अहमदनगर यांचे संयुक्त विद्यमाने शनिवार (ता. १०) राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन जिल्हा न्यायालय तसेच सर्व तालुका न्यायालयांमध्ये करण्यात आले.

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र.१२४/२०२५

अर्जदार १- अश्विनी अर्जुन कुठय्ये वय २५ वर्ष, धंदा घरकाम, रा. पिशोर ता. कन्नड़, जि. औरंगाबाद २) श्रध्दा पि. अर्जुन कुठय्ये वय ४ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क. अनंदार क्र. १ आई

-विरुध्द-

गर अर्जदार - १-महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद २-रंगनाथ रघुनाथ कुठय्ये, वय ६० वर्षे, धंदा शेती, रा. पिशोर ता. कन्नड, जि. औरंगाबाद

अर्ज - वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे विधीज्ञ पी. एस. जाधव यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असून अर्जदार क. १ ही अर्जदार क्र. २ ची आई असुन अर्जदार क्र. २ हा अर्जदार क्र. १ चा मुलगा आहे. तसेच गैरअर्जदार क्र. २ हा अर्जदार क्र. १ हीचा सासरा असुन अर्जदार अर्जदार क्र. २ चा आजोबा आहे. अर्जदार क्र. १ हीचे पती, अर्जदार क्र. २ चे वडील व गैरअर्जदार क्र. २ यांचा मुलगा नामे अर्जुन रंगनाथ कुठय्ये हा होता तो दिनांक १३/०६/२०२४ रोजी कॅन्सर हॉस्पीटल औरंगाबाद येथे उपचारा दरम्यान मयत झालेला आहे. तसेच अर्जदार क्र. १ हीची सासु व अजंदार क्र. २ ची आजी व गैरअर्जदार क्र. २ यांची पत्नी नामे सुरेखा रंगनाथ कुठय्ये या देखील मयत झालेल्या आहे.

अर्जदार यांना मयत अर्जुन रंगनाथ कुठय्ये यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसूल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच. विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी, वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार हे वारस प्रमाणपत्राची मागणी करीत आहे.

वरील नमुद अधिकाऱ्यांनी मा. न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवून येणे असे सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे, अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याहो न्यायालयात अर्ज कलेला नाही. अर्जदार क्र. १ व २. व गैरअर्जदार क्र. २ हे मयताचे कायदेशीर वारम आहे यांच्या व्यतीरीक्त मयतास इतर कोणीही वारस नाही.

त्याअर्थी सदरील जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचीत करण्यात येते की सदरील प्रकरणाबाबत कोणाचाही काही उजर, आक्षेप अथवा वारसाचे प्रमाणपत्र अर्जदाराला देण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत मा. कन्नड येथील दिवाणी न्यायालयात स्वतः अगर आपले विधीज्ञामार्फत हजर होउन उजर आक्षेप नोंदवावा व मुदतीत उजर आक्षेप न असल्यास अर्जदारांच्या हक्कात वारसाचे प्रमाणपत्र देण्याचे आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी. करीता है जाहीर प्रगटन.

दिनांक ३/०४/२०२५

ओदशावरुन

लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीखः १८/०६/२०२५
दि.कि. अर्ज क्र. २४३/२०२५

अर्जदार : १. रईस वहाब शेख, वयः ४८ वर्षे, धंदाः शेती, रा. पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. रउफ वहाब शेख, वयः ५१ वर्षे, धंदाः शेती, रा. पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद, ३. रुख्सानाबी वजीर शेख, वयः ५७ वर्षे, धंदाः घरकाम, रा. पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद, ४. सुलतानबी कालीक खान पठाण, वयः ४९ वर्षे, धंदाः घरकाम, रा. अनील नगर, पवार वाडी, चाळीसगांव, ता. चाळीसगांव, जि. जळगांव.

विरुध्द

गैरअर्जदार – महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. एच. जी. शेख यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ४ यांचे आजोबा नामे शेख रज्जाक शेख लाल हे दि.२५/०४/१९७३ रोजी मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत शेख रज्जाक शेख लाल यांना अर्जदार क्र. १ ते ४ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअथी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा, त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी

दि. २१/०४/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक | सहाय्यक धिक्षक

दिवाणी न्यायाधिश क स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. ए.आय. आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख २१/०६/२०२५
दि.कि. अर्ज क्र. २४७/२०२५

अर्जदार : १. युनुस नसीबखा पटेल, वयः ५८ वर्षे, धंदा मजुरी, रा. पळशी (बु.). ता. कन्नड, जि. औरंगाबाद, २) अनिसखा नसीबखा पटेल, वयः ४८ वर्षे, धंदाः मजुरी, रा. पळशी (बु.), ता. कन्नड, जि. औरंगाबाद, ३) अय्युब नसीबखा पटेल, वयः ४३ वर्षे, धंदाः मजुरी, रा. पळशी (बु.), ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४) रेहानाबी करीम शेख, वयः ५५ वर्षे, धंदाः घरकाम, रा. हस्ता, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ५) रुकसाना बेगम गुलाब अहेमद, वयः ५२ वर्षे, धंदाः घरकाम, रा. टाकळी रा.रा., ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद,

विरुध्द

गैरअर्जदार – महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद,

अर्जः वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअथी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. एच. जी. शेख यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ५ यांचे वडील नामे नसोबखा महेबूबखा पटेल हे दि.३०/०७/ १९९९ रोजी मौजे पळशी (बु), ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मयताचे मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत नसीबखा महेबूबखा पटेल यांना अर्जदार क्र. १ ते ५ हेच कायदेशीर वारस असून इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअथी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळवण्यात येते को, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी

दि. २९/०४/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक | सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

## अग्रलेख...

# निर्णायक धडा शिकवाच!

भारत आणि पाकिस्तान यांच्यात अखेर युद्धाला सुरुवात झाली आहे. या दोन देशांत ५४ वर्षांनंतर पहिल्यांदाच थेट युद्धाला तोंड फुटले आहे. याआधी १९७१ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्ध झाले होते. १९९९ मध्ये कारगिल युद्ध झाले होते, पण त्या युद्धाची व्याप्ती तेवढ्याच भागापुरती मर्यादित होती. त्या युद्धाच्या ज्वाळात त्यावेळी संपूर्ण पाकिस्तानातील जनता होरपळली नव्हती. यावेळी मात्र पाकिस्तानातील जनतेला आतापासून या युद्धाचे चटके बसू लागले आहेत. १९७१ च्या तसेच नंतर कारगिल युद्धात हाग्या मार खाल्ल्यानंतरही पाकिस्तानला शहाणपण येत नाही, याचे आश्चर्य वाटते. पाकिस्तानने आपल्या आततायीपणामुळे हे युद्ध ओढवून घेतले, भारतावर लादले, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. त्याने आपली स्थिती 'आ बैल मुझे मार' अशी करून घेतली आहे. पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी पहलगाम येथे निर्दोष भारतीय पर्यटकांची हत्या केली. या घटनेनंतरही भारताने आपल्या मनावर दगड ठेवत जगाला संयमाचे दर्शन घडवले. मात्र या संयमाला भारताचा भेकडपणा समजण्याची चूक पाकिस्तानने केली. पहलगाम येथे पर्यटकांची हत्या दहशतवाद्यांनी केल्यामुळे भारताने पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या तळांवर हल्ला चढवला. यात अनेक अतिरेकी आणि त्यांचे पिलांटू मारले गेले. भारताने पाकिस्तानातील लष्करी तळांवर तसेच निवासी भागांना जाणीवपूर्वक लक्ष्य केले नाही, कारण भारताला पाकिस्तानविरुद्ध युद्ध करायचे नव्हते.

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात आपला सहभाग नसल्याचा दावा पाकिस्तान करत आहे. खरे म्हणजे ही त्याची पश्चातबुद्धी म्हणायला पाहिजे. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात आपला हात नसल्याच्या पाकिस्तानच्या दाव्यावर शेंबडे पोरही विश्वास ठेवणार नाही. दहशतवादी संघटना आणि पाकिस्तान या एकाच नाण्याच्या दोन बाजू म्हणायला पाहिजेत. भारताने आपली लष्करी कारवाई पाकिस्तानविरुद्ध केली नव्हती, तर पाकिस्तानातील दहशतवाद्यांविरुद्ध केली होती. त्यामुळे पाकिस्तानने भारताच्या सीमावर्ती भागात गोळीबार करण्याची गरज नव्हती. पाकिस्तान शांत राहिला असता तर दोन देशांतील युद्ध टळले असते. कारण भारत स्वत:हून पाकिस्तानवर हल्ला करणार नव्हता. आक्रमण करण्याची भारताची संस्कृती नसली तरी कोणी आक्रमण केले तर समोरच्याला सोडण्याचीही आपल्या देशाची संस्कृती नाही. गृहमंत्री अमित शाह यांनी भारताच्या या भूमिकेचा परिचय 'हम खुद होकर छेडेंगे नहीं, हमको छेडा तो छोडेंगे भी नहीं', या शब्दात करून दिला. भगवान श्रीकृष्ण हा भारताचा आदर्श वारसा आहे. सुरुवातीला कौरव आणि पांडव यांच्यात युद्ध होऊ नये म्हणून मध्यस्थी करणाऱ्या कृष्णाने नंतर पांडवांच्या बाजूने युद्धात भाग घेतला होता. एवढेच नाही तर युद्धभूमीवर आपलेच आप्तस्वकीय समोर पाहून गलितगात्र झालेल्या अर्जुनाला युद्ध करण्यासाठी गीताही सांगितली होती. युद्ध वा लढाई हा कोणत्याही समस्येवर पर्याय नसला तरी आवश्यक झाले तर ते करावेच लागते. युद्धाने कोणत्याही समस्येवर तोडगा निघू शकत नाही, हे सुभाषितवजा वाक्य ऐकायला चांगले वाटत असले तरी 'लातों के भूत बातों से नहीं मानते', ही सुद्धा वस्तुस्थिती आहे. पाकिस्तानला मुत्सद्देगिरीची भाषा समजत नाही तर बंदुकीच्या गोळीची भाषा समजते. पाकिस्तानी लष्कर आणि राज्यकर्त्यांनी आपल्या राजकीय स्वार्थासाठी पाकिस्तानातील जनतेला विनाशाच्या खाईत लोटले आहे.

अटलबिहारी वाजपेयींपासून नरेंद्र मोदींपर्यंत प्रत्येक पंतप्रधानाने पाकिस्तानसमोर मैत्रीचा हात केला, पण पाकिस्तानने भारताचा हा मैत्रीचा हात झिडकारून लावला. त्याची किंमत आता पाकिस्तानचे लष्कर आणि राज्यकर्त्यांसोबत सर्वसामान्य जनतेलाही चुकवावी लागत आहे. पाकिस्तानने भारताच्या सीमावर्ती भागातील निर्दोष लोकांवर केलेल्या गोळीबाराची मोठी किंमत पाकिस्तानला चुकवावी लागत आहे. भारताने पाकिस्तानवर जोरदार प्रतिहल्ला चढवला. आपले संरक्षण करण्याचा प्रत्येक देशाला हक्क असतो, तो त्याचा अधिकारही असतो. यासाठी त्याच्यावर जगातील कोणतीही महाशक्ती हरकत घेऊ शकत नाही. भारताने पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद, रावळपिंडी आणि लाहोरसह अन्य शहरांवर जोरदार हल्ला चढवला. यात पाकिस्तानच्या बाजूला अपरिमित हानी झाली. बाजवाड येथील लष्करी तळावरील हल्ल्याने तर पाकिस्तानाचे नाक कापले गेले. सर्वांत महत्त्वाचे पाकिस्तानात तसेच जगातही पाकिस्तानची नाचक्की झाली. जो देश आपल्या राजधानीचे रक्षण करू शकत नाही, त्याचे जगात हसे होणे स्वाभाविक आहे. पाकिस्तानने भारतातील सीमावर्ती भागातील जम्मू, श्रीनगर, पठाणकोट, जैसलमेर, बाडमेर, भूज, भटिंडा, जालंधर, चंदीगढ, लुधियाना, अमृतसर आणि कपूरथळा या शहरांवर एक़ाच वेळी हजारो ड्रोन तसेच क्षेपणास्त्रांचा हल्ला करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. भारताच्या एस ४०० आणि आकाश या क्षेपणास्त्रविरोधी यंत्रणांनी पाकिस्तानचा हा ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ला निष्प्रभ केला. भारताच्या सुरक्षा यंत्रणांनी प्रत्युत्तरात पाकिस्तानवर असा काही जोरदार हल्ला चढवला की तेथील जनतेचे तर सोडा पण लष्करी अधिकाऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले, त्यांना शब्दश : मैदान सोडून पळावे लागले.

भारताच्या संयमाची परीक्षा घेण्याची घोडचूक पाकिस्तानने केली आणि त्याला त्याची जबर किंमत चुकवावी लागत आहे. भारताच्या लढाऊ विमानांनी पाकिस्तानच्या तळावर बॉम्बवर्षाव करत त्यांना भाजून काढले. भारताने पाकिस्तानची चार लढाऊ विमाने पाडली, भारतीय नौदलाच्या हल्ल्यात पाकिस्तानच्या कराची बंदराचे मोठे नुकसान झाले. खरं म्हणजे ही तर फक्त सुरुवात आहे, याचा शेवट कसा होणार ते लवकरच दिसणार आहे. भगवान कृष्णाने सांगितल्याप्रमाणे भारत नैतिक युद्ध लढत आहे. आजपर्यंत आपल्या देशाने स्वत:हून कधीही दुसऱ्या देशावर आक्रमण केले नाही, तर आपल्या देशाचे संरक्षण करण्यासाठी प्रत्युत्तरात कारवाई केली, हा इतिहास आहे. पाकिस्तानचा इतिहास याच्या नेमका उलट आहे. देशवासीयांचे तसेच देशाची एकता, अखंडता आणि सार्वभौमत्वासाठी युद्ध करण्यात काहीच गैर नसते. भारताने आता पाकिस्तानशी युद्ध सुरूच केले आहे, तर ते निर्णायक टप्प्यात पोहोचवूनच थांबले पाहिजे. स्वातंत्र्यप्राप्तीपासून भारताला भेडसावत असलेली पाकिस्तानची समस्या कायमस्वरूपी सोडवली पाहिजे. इस्रायलने हमासची जशी स्थिती केली, तशीच भारताने पाकिस्तानची करून टाकली पाहिजे. पाकिस्तानची वागणूक ही कुत्र्याच्या शेपटासारखी आहे. काहीही केले तरी अगदी नळीत घातले तरी कुत्र्याचे शेपूट वाकडेच असते. भारताने आतापर्यंत पाकिस्तानला खूप वेळा संधी दिली. देशातील जनतेचा दबाव असतानाही कठोर लष्करी कारवाई केली नाही. पण आताचे सरकार हे ५६ इंच छाती असलेल्या नरेंद्र मोदी यांचे आहे. याचे पाकिस्तानच्या लष्कराला तसेच राज्यकर्त्यांना भान राहिले नाही. पहलगाम येथे निष्पाप पर्यटकाची दहशतवाद्यांनी हत्या करून पाकिस्तानने आपल्या हाताने आपल्याच शवपेटीवर शेवटचा खिळा ठोकण्याची तयारी केली. भारताच्या आक्रमक हल्ल्यानंतर पाकिस्तानात गृहयुद्धाची स्थिती उद्‌भवली आहे. बलुच लिबरेशन आर्मीने पाकिस्तानी लष्कराच्या चौक्यांवर हल्ले चढवले आहेत. दुसरीकडे माजी पंतप्रधान इम्रान खानचे समर्थकही रस्त्यावर उतरले आहेत. इम्रान खानची सुटका करा, तरच आम्ही सरकारच्या बाजूने लढू असा इशारा त्यांनी दिला आहे. पाकिस्तानी राज्यकर्त्यांची स्थिती घर फिरले की घराचे वासे फिरतात तशी झाली आहे. पहलगाम येथील निर्दोष पर्यटकाची अतिरेक्यांच्या हातून हत्या करत पाकिस्तानने पहिली चूक केली. दुसरी चूक भारताच्या सीमावर्ती भागात गोळीबार करून आणि तेथील जनतेची हत्या करून केली आहे. पाकिस्तानच्या या गुन्ह्याला आता माफी नाही. पाकिस्तानने मधमाशाच्या पोळ्याला हात घातला आहे, त्यामुळे त्याला पळता भूई थोडी झाल्याशिवाय राहणार नाही. व्याप्त काश्मीरवर पाणी सोडून पाकिस्तानला आता भारतासमोर शरणागती पत्करण्याशिवाय पर्याय राहिला नाही.

---


## यंगिस्तान

### जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# एक वोट की कीमत...

''एक चुटकी सिंदूर की कीमत'' पाकिस्तानला चुकवावी लागत आहे. आपल्या सैनिकांनी पहलगाममधील अतिरेकी हल्ल्याचा प्रतिशोध घेत पाकिस्तानमधील ९ दहशतवादी अड्डे नेस्तनाबूत केले. भारताने सामान्य जनता आणि पाक सैन्य यावर हल्ला चढवला नव्हता. मात्र डोकं गहाण ठेवलेल्या पाकिस्तानने सामान्य भारतीयांना लक्ष्य केले आणि भारताने प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानात दिवाळी साजरी करायला सुरुवात केली. आता युद्ध सुरू झाले आहे. पहलगाममध्ये जिहादी दहशतवाद्यांनी हिंदू पुरुषांना मारून आमच्या बहिणींचं कुंकू पुसलं. म्हणूनच या ऑपरेशनला सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर' असं नाव दिलं. काही मूर्ख लोकांना हे नाव आवडलं नाही. पण अशा मूर्खांची आपल्या देशात कमी नाही. आज जे युद्ध सुरू आहे त्याचा अर्थ 'एक चुटकी सिंदूर की कीमत' असा आहे. पूर्वी पाकिस्तानने आपल्या आया-बहिणींचं कुंकू अनेकदा पुसलं होतं. मात्र तेव्हा आपली राजकीय इच्छाशक्ती अतिशय दुबळी होती. आपण आपलं मूळ तत्त्व विसरुन बसलो होतो. ज्या भगवद्‌गीतेला आपण आदर्श मानतो, त्याच पवित्र ग्रंथाचा आपल्याला विसर पडला होता. अर्जुनाला युद्धासाठी प्रवृत्त करणारा आपला देव आहे. वाटाघाटी, शांतीचे संदेश या सर्व गोष्टी कामी नाही आल्या तर शेवटी युद्ध करावं लागतं. 'युद्ध नको बुद्ध हवा' हे फेक नॅरेटिव्ह आहे. खरं पाहता, 'बुद्ध हवा असेल तर बुद्धाला नष्ट करू पाहणाऱ्यांशी युद्ध करावंच लागतं.' जवळजवळ आपल्या सर्वच देवी-देवतांच्या हातात शस्त्र आहे. ते शस्त्र आपल्या तत्कालीन नेत्यांनी काढून घेतलं होतं. आपल्याला भवानी तलवारीचा विसर पडला होता आणि या सर्व गोष्टी काँग्रेसी संस्कृतीने केल्या होत्या. मात्र आता काळ बदलला आहे. खुज्या वृत्तीचे राज्यकर्ते आता सत्तेवर बसलेले नाहीत. राष्ट्रभक्त संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीतून जन्माला आलेले देशभक्त नरेंद्र मोदी आता पंतप्रधान आहेत. त्यामुळे २०१४ पासून पाकिस्तानचे नापाक कारनामे थोडे मंदावले होते. सर्जिकल स्ट्राईक आणि एअर स्ट्राईकमुळे पाकला कळून चुकले होते की हे सरकार पूर्वीसारखे नाही. हे आपल्याकडे पुरावे मागत नाहीत तर थेट आत घुसून वार करणारे सरकार आहे.

कलम ३७० निष्प्रभ झाल्यानंतर पाकिस्तान बिथरला होता. पण त्याला मोठी कारवाई करता आली नव्हती. त्यानंतरही पाकचे अतिरेकी हल्ले सुरूच होते. मात्र पहलगाममधील हल्ल्याने कळस गाठला. या हल्ल्यानंतर मोदींनी सिंधू करार स्थगित केला, पाकिस्तानचे सोशल मीडिया हॅण्डल ब्लॉक केले म्हणून अनेक स्वयंघोषित पुरोगामी मंडळी मोदींवर



टीका करत होती. हल्ला कधी करणार म्हणून चिडवत होती. सकाळचा ९ वाजताचा भोंगाही बोंबलत होता. या लोकांना वाटतं की मोदी म्हणजे राहुल गांधी किंवा मनमोहनसिंह आहेत. नरेंद्र मोदी सरकारने व्यवस्थित नियोजन करून पाकविरुद्ध मोहीम उभारली आहे. एकीकडे युद्ध आणि दुसरीकडे पाकचा खरा चेहरा उघडा पाडणे अशा प्रकारची ीनिती मोदी सरकारने राबवली आहे. आज पाकिस्तानची अनेक शहरे उद्‌ध्वस्त होत आहेत. पाकिस्तानी जनता त्रस्त झाली आहे. तिथे गृहयुद्ध सुरू झाले आहे. बलुचिस्तान स्वतंत्र होण्याची मोहीम बळकट झाली आहे. अफगाणिस्तानची करडी नजर पाकवर आहे. चारही बाजूंनी पाकिस्तान घेरला गेला आहे. हे भारतीय सैन्याचं शौर्य आहेच. परंतु राजकीय इच्छाशक्ती नसेल तर काहीही होऊ शकत नाही. २६/११ च्या वेळी आपली काय अवस्था होती. पाक पुरस्कृत अतिरेक्यांनी मुंबईत हाहाकार माजवला, रक्ताचे पाट वाहिले परंतु आपले तत्कालीन पंतप्रधान मान खाली घालून उभे राहिले. त्यांनी प्रतिशोध घेतला नाही. प्रतिशोध घेण्याची कुवत त्यांच्याकडे नव्हती. आज मोदी सरकारने कुंकू पुसल्याचा प्रतिशोध घेतला. पीडितांच्या मनात प्रतिशोध घेतल्याचं समाधान आहे. भीमाने दुःशासनाची छाती फाडली आणि त्याच्या रक्ताने द्रौपदीच्या केसांना अभिषेक केला. नरेंद्र मोदी हे त्या महापराक्रमी भीमाचे वैचारिक वंशज आहेत. विचार करा, जर आज नरेंद्र मोदी हे पंतप्रधान नसते तर आपल्या शूरवीर सैन्याला शौर्य दाखवण्याची संधी मिळाली असती का? १९७१ च्या युद्धात भारतीय सैन्याने प्रचंड पराक्रम गाजवला. परंतु इंदिरा गांधींना भारताचा फायदा करून घेता आला नाही. आपण जिंकूनही आपल्या पदरात काहीच पडले नाही. उलट ज्या बांगलादेशला आपण स्वातंत्र्य मिळवून दिले, तोच आज आपल्याविरुद्ध जाऊ लागला आहे. म्हणूनच या देशावर अशा नेत्याचे राज्य असले पाहिजे ज्याच्या कुळात देशभक्ती आहे, ज्याच्या रंध्रात राष्ट्रप्रेम आहे आणि असा नेता आपल्याला लाभला आहे. आज हा दिवस पाहायला मिळतोय कारण आपण योग्य ठिकाणी मतदान केलं, वोट केलं.

आपलं सैन्य पाकिस्तानला योग्य तो धडा शिकवेल. परंतु भारतीय म्हणून, हिंदू म्हणून आपली जबाबदारी आणखी वाढली आहे. कारण मी मागच्या ''भारतात असलेल्या पाकिस्तानचं काय करायचं?'' या लेखात म्हटलं त्याप्रमाणे आपल्याला भारतात असलेल्या पाकिस्तानशी आणि त्यांच्या समर्थकांशी वैचारिक संघर्ष करावा लागणार आहे. यासाठी आपण तयार राहिलं पाहिजे. ही इको-सिस्टिम मोदींना व आपल्या सैन्याला बदनाम करण्याचा प्रयत्न करेल. जाप्रमाणे इस्रायलवर अस्त्र उभारले जाते, हाच प्रयोग आपल्या बाबतीतही घडू शकतो. पॅलीवूड हे नाव 'पॅलेस्टाईन' आणि 'हॉलीवूड'वरून घेण्यात आले आहे. ही एक चुकीची माहिती प्रदर्शित करणारी धूर्त मोहीम आहे जी इस्रायलशी झालेल्या संघर्षादरम्यान वापरली गेली. यामध्ये पॅलेस्टिनींवर झालेल्या खोट्या अत्याचाराचे व्हिडीओ व फोटो जगभरात सोशल मीडियाच्या रूपाने प्रदर्शित करण्यात आले. २००० मध्ये मुहम्मद अल-दुर्राह यांच्या हत्येनंतर हा शब्द प्रचलित झाला. हा शब्द इस्रायली लोकांनी वापरायला सुरुवात केली. थोडक्यात खोटी रडारड करून व्हिक्टिम कार्ड खेळणे म्हणजेच पॅलीवूड. गुजरात दंगलीमध्ये मोदींविरुद्ध अशीच नीती वापरली होती.

मोदींना राक्षस ठरवण्यासाठी सगळी डावी इको-सिस्टिम कामाला लागली होती. मात्र भारतीय जनतेने नरेंद्र मोदींनाच आपल्या हृदयाच्या सिंहासनावर बसवलं आणि आज आपण ताठ मानेने जगत आहोत. ही आहे एका व्होटची किंमत... आपण मतदान करताना योग्य बटण दाबलं म्हणून ३७० हटवलं गेलं, वक्फ सुधारणा कायदा लागू झाला, तिहेरी तलाक कायदा अस्तित्वात आला, एअर स्ट्राईक-सर्जिकल स्ट्राईक झालं, आपण मतदान करताना योग्य बटण दाबलं म्हणून ऑपरेशन सिंदूर यशस्वी झालं. 'एक चुटकी सिंदूर की कीमत' पाकिस्तानला चुकवावी लागली कारण आपल्याला 'एक वोट की कीमत' कळली आहे. एका व्होटचे मूल्य किती आहे पाहा. १५ लाख खात्यात जमा झाल्याची भावना वेळोवेळी जागृत होते. म्हणूनच यापुढे मतदान करताना ही 'कीमत' आपल्याला लक्षात ठेवायची आहे आणि आपण ज्यांना व्होट केलं त्यांच्या विरुद्ध फेक नॅरेटिव्ह चालवणाऱ्यांच्या विरुद्ध वैचारिक मोहीम उभी करून आपल्याला ही कीमत अदा करायची आहे.

भारतीय सैन्याला प्रचंड यश लाभो!

पाकिस्तानरुपी राक्षसाचा संहार होवो!

हर हर महादेव! जय भवानी, जय शिवाजी!

writerjayeshmestry@gmail.com

---

## वेध

### हेमंत सालोडकर

# शिबिरांतून विकसित भारताचे संस्कार

सध्या शाळांच्या परीक्षा होऊन सुट्या लागल्या आहेत. काही शाळांचे निकालही लागले आहेत. अशात दरवर्षीप्रमाणे शाळांमध्ये आणि वस्त्या-वस्त्यांमध्ये लहान मुलांमध्ये संस्कार रुजावे यासाठी शिबिरांचे आयोजन मोठ्या प्रमाणात घेण्यात येत आहेत. प्रत्येक शहरातील वस्त्यांमध्ये घरोघरी फिरून सहा-सात वर्षांपर्यंतचे मुले-मुली आहेत का, याचा शोध घेऊन वस्तीतील मंदिरात किंवा कुणाच्या मोठ्या घरी संस्कार शिबिरे होत आहेत. येथे लहान मुलांना गाणी, गोष्टी, योग, चित्रकला, हस्तकला, पर्यावरण संरक्षण, स्वदेशी व आत्मनिर्भरता, सामाजिक जाणीव, नागरी कर्तव्य अशा अनेक विषयांचे शिक्षण दिले जाते. यातूनच विद्यार्थ्यांवर बालपणापासून संस्कार बिंबविले जातात. दरवर्षी होणाऱ्या संस्कार शिबिरांतून भविष्यातील जबाबदार नागरिकांची पिढी घडावी असा उद्देश असतो. लहान वयापासूनच मुलांवर चांगले संस्कार केले तर मुले दुसरीकडे कुठेही गेले तरी आपल्या वागणुकीतून इतरांवर आपली छाप सोडत असतात आणि आम्ही इतरांपेक्षा सरस असल्याचा ठसा उपस्थितांवर उमटतो. लहान मुले कोणतीही गोष्ट लवकर शिकतात. त्यामुळे त्यांच्यावर योग्य संस्कार केल्यास त्यांच्यात चांगले परिवर्तन घडू शकते आणि हीच पिढी पुढे १२-१३ वर्षांनंतर संस्कारशील तरुण-तरुणी म्हणून देशाचा नावलौकिक करू शकतात. सध्या लहान मुले मोबाईलच्या आहारी गेल्याची सर्वांचीच तक्रार असते. अगदी तीन वर्षांचा मुलगाही किती सराईतपणे मोबाईल हाताळतो, असे त्याचे पालकच कौतुकाने सांगतात. पण त्याच्या तल्लख बुद्धीचा उपयोग चांगल्या कामासाठी केला तर तोच मुलगा पुढे देशाच्या तंत्रज्ञानासाठी कामी येईल. असे अनेक विद्यार्थी घडले तर देश तंत्रज्ञानात जगात पुढे राहील. मोबाईलचा वापर वाईटापेक्षा चांगल्या कामासाठीही करता येतो, हे अशा विद्यार्थ्यांच्या उदाहरणांवरून दिसून येईल.

संस्कार म्हणजे चांगले आहे, त्याला अधिक चांगले करणे होय. घरचे सर्व लोक जेवायला बसण्यापूर्वी त्याची सर्व तयारी करण्याची जबाबदारी मुलाला दिली तर त्याला नीटनेटकेपणाची सवय लागेल. जेवण झाल्यानंतर अन्न उचलणे, जेवणाची जागा स्वच्छ करणे यातून स्वच्छतेचा संस्कार त्याच्यावर होईल. घर, घराशेजारील परिसर स्वच्छ ठेवण्याचा संस्कार लहान वयापासूनच मुलांच्या अंगवळणी पडतो. या सवयी तो इतरही ठिकाणी गेला तरी कायम राहतील आणि त्यातून त्याचे वेगळेपण नक्कीच दिसेल. संस्कार शिबिरातून गाणे, गोष्टी, योगसाधनेतून मुलांची स्मरणशक्ती वाढेल. स्मरणशक्ती वाढविण्यासाठी वेगळ्या शिकवण्या लावायची गरज पालकांना पडणार नाही. मोठ्यांबरोबर मुलगा बाजारात गेला तर त्याला चार-पाच भाज्यांची नावे लक्षात ठेवायला सांगून त्यातून त्याची स्मरणशक्ती वाढवता येईल. चित्रकला, हस्तकला यामधून हाताला चांगले वळण लागून आपले काम उत्कृष्टच झाले पाहिजे, हा संस्कारही त्यांच्या मनावर रुजेल. घरातील प्रत्येक वस्तू त्या त्या जागेवरच राहिली पाहिजे. म्हणजे दुसऱ्या कुणाला ती वस्तू हवी असल्यास पटकन सापडेल. यातून हातचे काम लगेच करण्याचा संस्कारही मुलांवर बिंबवता येईल. शिबिरांतून पर्यावरण रक्षणाची शिकवण देताना त्यांना मातीशी खेळण्याची संधी मिळाली तर यातून अनेक कृषितज्ज्ञ देशाला मिळतील. लहानपणी झाडाला पाणी, खते देणे यातून तो निसर्गाशी जोडला जाईल. पाण्याचे महत्त्वही त्याला लहानपणापासूनच समजेल. पुढच्या काही वर्षांनंतर मातीवर, शेतीवर अनेक प्रयोग करून प्रगतिशील शेतकरी म्हणून त्याचा नावलौकिक होईल. शेतात चांगले पीक घेतले तर देश अन्नधान्याने सुजलाम् सुफलाम् बनवतील. त्यामुळे आपल्याला इतर देशांतून अन्नधान्य आयात करण्याची गरज पडणार नाही. संस्कार शिबिरात भारतीय संस्कृतीसंबंधी शिकवण देण्यात आली तर विद्यार्थी पाश्चात्त्य संस्कृतीचे अंधानुकरण करणार नाही तसेच भारतीय पद्धतीने स्वत:चा, आई-वडिलांचा, भाऊ-बहिणीचा वाढदिवस कसा साजरा करतात, याचे प्रात्यक्षिक देण्यात यावे. संस्कार शिबिरात आपली मुले काय शिकतात, हे पाहण्यासाठी शेवटच्या दिवशी सर्व शिबिरार्थींना एकत्र बोलावून त्याचे प्रात्यक्षिक दाखवले तर पालकांचेही समाधान होते. अशा संस्कार शिबिरात वेगवेगळ्या जाती-धर्मांची मुले एकत्र येत असल्याने त्यांच्यात सामाजिक बंधुभाव निर्माण होतो. म्हणजेच संस्कार शिबिरातून लहानपणापासूनच मुलांवर सामाजिक, कौटुंबिक प्रबोधन, पर्यावरण संरक्षण, स्वदेशीचे महत्त्व अर्थात् आत्मनिर्भरता आणि नागरी कर्तव्य रुजवले आणि अशीच शिबिरे सतत होत गेली तर भारत देश पुढील २०-२५ वर्षांत विकसित राष्ट्र म्हणून उदयास येईल आणि हेच संस्कार शिबिरांचे यश राहील.

९८५०७५३२८१

---

## मुंबई वार्तापत्र


### नागेश दाचेवार

# हतबल चाणक्य!

महाराष्ट्राच्या राजकारणातील मातब्बर, भीष्माचार्य, जाणता राजा, चाणाक्ष नेते आणि चाणक्य अशा अनेक बिरुदावलीने ओळखले जाणारे शरद पवार हे आता काल-परवा म्हणजे, सहा महिन्यांअगोदर विधानसभा निवडणुकीच्या मैदानात बाह्या खोचून तयार होते; आणि सहाच महिन्यांत अचानक असं काय घडलं की, तेल लावलेला हा पहेलवान इतका हतबल झाला? महाराष्ट्राचा तथाकथित चाणक्य हा यावेळी इतका हतबल का झाला, असा प्रश्न आता सर्वत्र आश्चर्याने केला जात आहे.

तसे कुटिल कारस्थानं करण्याची, जिथे-तिथे काड्या करण्याची, मैदान सोडून पळण्याची ही चाणक्य साहेबांची जुनीच सवय आहे. पहिले काँग्रेस फोडून तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटलांचे सरकार पाडले आणि स्वतः मुख्यमंत्री झाले. त्यानंतर १९९९ मध्ये पुन्हा भाजपा-सेना युतीचं सरकार येऊ नये यासाठी ज्या काँग्रेसमधून बाहेर पडून शड्डू ठोकला होता, त्यांच्यासोबतच सरकार स्थापन केले. पुन्हा तसाच थोडा वेगळा दगाबाजीचा प्रयोग म्हणजे भाजपाचं सरकार येऊ नये आणि आपण सत्तेत आलो पाहिजे म्हणून शिवसेनेला फूस लावून तीन पक्ष मिळून सरकार स्थापन करण्यात आले. अशी कटकारस्थानं शरद पवार हे सातत्याने महाराष्ट्राच्या राजकारणात करीत आले आहेत. त्याचवेळी २०१४ साली याच पहेलवानाने माढाच्या मैदानातून पळदेखील काढला होता. यावेळी मात्र कोणतीही चाणक्य खेळी वगैरे नव्हती. माढातून पराभव होण्याची गुप्त माहिती अंतर्गत सर्व्हेतून मिळाल्याने या भीष्माचार्याने अब्रू वाचविण्यासाठी आता निवडणूक लढणार नाही म्हणत, तेथून काढता पाय घेतला होता. त्यावेळी शरद पवारांना वाऱ्याची दिशा कळते, असा खोचक टोला नरेंद्र मोदी यांनी लगावला होता.

पंतप्रधानांनी २०१४ मध्ये म्हटलेल्या वाक्याची पुनरावृत्ती करण्याची वेळ आता २०२५ मध्ये आली आहे. पवारांना आपलं आणि आपल्या मुलीचं पुढचं राजकीय भवितव्य धोक्यात दिसायला लागलं आहे की काय? त्यामुळेच अचानक पवार चिंतेत पडल्याचे दिसत आहेत. आत्ता कालपरवापर्यंत जे सख्खे काका आपल्या मुलीच्या आंधळ्या प्रेमासाठी पुतण्या अजित पवारांचा राजकीय बळी द्यायला निघाले होते, ते आता अचानक पुतण्यासमोर शरणागती पत्करताना दिसत आहेत.



एक दिवसअगोदर शरद पवारांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्यासंबंधी सुतोवाच केले. दोन्ही पक्षांतील नेते एकाच विचारधारेचे आहेत. आमच्यातील काहींना वाटते आपल्या क्षेत्रांत विकास कामे व्हावीत यासाठी सत्तेसोबत गेलं पाहिजे असं मत आहे तर काहींचा विरोध आहे. त्यामुळे एकत्र यायचे की नाही हा निर्णय पक्षातील नव्या पिढीने, सुप्रिया सुळेंनी घ्यायचा आहे या प्रक्रियेत मी नाही, असे वक्तव्य केले. आता अचानक पवारांना पुतण्या अजित पवार यांच्यासोबत जाण्याची उपरती कशी काय झाली, असा प्रश्न निर्माण झाला आहे. ज्या पुतण्याला पाडण्यासाठी, पुतण्याच्या बायकोला पाडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. पुतण्याचा पक्ष संपविण्यासाठी निवडणूक आयोगात आणि न्यायालयात याचिका दाखल केली. पुतण्याचे सदस्यत्व संपविण्यासाठी विधानसभाध्यक्षांकडे अपात्रतेचे पत्र देण्यात आले. आता पक्ष सोडून गेलेल्यांना कोणत्याही परिस्थितीत परत घेणार नाही, असे अप्रत्यक्षपणे अजित पवारांना उद्देशून राणाभीमदेवी घोषणा लोकसभा निवडणुकीवेळी दस्तुरखुद्द शरद पवारांनी केली होती. त्याच पुतण्यासोबत जाण्याची भाषा आता अचानक पवार बोलायला लागले, याचे आश्चर्य आहे. बरं, हे सगळं सांगत असताना या प्रक्रियेत मी नाही हे आवर्जून सांगणाऱ्या पवारांच्या शब्दाबाहेर मुलगी सुप्रिया कधीपासून गेली? म्हणजे मुलगी बापाला विचारणार नाही, ती परस्पर निर्णय घेईल, जो पक्ष वाचविण्यासाठी मुलीच्या स्वाधीन करण्यासाठी, मुलीला त्या पक्षाचं सर्वेसर्वा करण्यासाठी जंगजंग पछाडणारा बाप हे सगळं घडत असताना बसून गपगुमान उघड्या डोळ्याचा धृतराष्ट्र बनून बघत बसेल, ही बाब पचनी पडण्यासारखी आहे?

दोन्ही पक्ष एकत्रित येणे म्हणजे मूळ राष्ट्रवादीत दुसरा गट विलीन करणे. आता मूळ राष्ट्रवादी अजित पवारांकडे आहे. त्यामुळे सुप्रियाताईला त्यांचा शरद पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलीन करून अजित पवारांच्या नेतृत्वात काम करावं लागेल आणि पक्षाचे सर्वेसर्वा हे अजित पवार असतील. त्यांचे निर्णय गपगुमान ताईंना आणि पर्यायाने ताईंच्या वडिलांना ऐकावे लागतील. बाकीच्यांची अर्थात रोहित पवार, जितेंद्र आव्हाडांच्या परिस्थितीची तर कल्पनाच करवल्या जात नाही. त्यामुळे महाराष्ट्राच्या चाणक्यावर, जाणता राजावर इतकी शरणागती पत्करण्याची, हतबल होण्याची, लाचारी पत्करण्याची वेळ का आली असावी, हा खरा प्रश्न आहे.

आपल्या पश्चात मुलीचे राजकीय भवितव्य सुरक्षित करण्याचा एका हतबल बापाचा हा प्रयत्न आहे की आपला दिल्लीतला बंगला सुरक्षित करण्याची पुढच्या वर्षीची ही तयारी आहे? कारण पुढच्या वर्षी २ एप्रिल २०२६ ला पवारांच्या राज्यसभा सदस्यत्वाचा कालावधी संपत आहे आणि पवारांसह आणखी केंद्रीय मंत्री रामदास आठवले, उबाठाच्या प्रियांका चतुर्वेदी, शरद पवार गटाच्या फौजिया खान, काँग्रेसच्या रजनी पाटील आणि भाजपाचे भागवत कराड, धैर्यशील पाटील या सहा जणांचा कालावधी संपणार आहे. त्यामुळे पुढल्या वर्षी सात जागांसाठी निवडणूक झाली तर राज्यसभेवर निवडून जाण्यासाठी एका सदस्याला विधानसभा सदस्यांची किमान ३७ मतं लागतील. आजघडीला मविआकडे केवळ एक सदस्य सहज निवडून येण्याइतके संख्याबळ आहे. मात्र, यात ठाकरेंचे सर्वाधिक २० सदस्य, त्यापाठोपाठ काँग्रेसचे १६ आहेत आणि राष्ट्रवादीचे केवळ १० विधानसभा सदस्य आहेत. त्यामुळे आता सर्वाधिक सदस्य असणारे लोक आपला दावा सोडणार नाही आणि मग ऐनवेळेवर आपली गोची होईल, याची भीती शरद पवारांना वाटतेय का? त्यामुळे शरद पवार हतबल होऊन शरणागती पत्करत असावेत का? कारणं काहीही असोत, पण पवारांनी केलेल्या वक्तव्यातून एका थकलेल्या बापाची व्यथा उद्‌धृत होत आहे.

९२७०३३३८८६

---

## वाचक पत्रे

### आता 'नापाक' व्याप्त काश्मीर 'पाक' करूनच घ्या

कारगिल युद्धाच्या वेळी दर्शविलेली सहिष्णुता आता दाखवू नका. नापाक व्याप्त काश्मीर पाक (पवित्र) झाल्याशिवाय आता थांबू नका. दि. ६ मे २०२५ च्या मध्यरात्री 'ऑपरेशन सिंदूर' झाल्याची बातमी सकाळी दूरचित्रवाणीवर पाहिली आणि भारताच्या तिन्ही सैन्यदलांबद्दल, भारत सरकारबद्दल असलेला अभिमान द्विगुणित झाला. २२ एप्रिलला पहलगाम येथे घडवून आणलेल्या दुर्दैवी प्रसंगाच्या वेळी ज्यांचे हकनाक प्राण गेले त्यांच्याबद्दल वाईट वाटत होतेच. पण त्यानंतर एका मराठी म्हणीचीही आठवण होत होती, 'जे होतं ते चांगल्यासाठीच..'

दि. ६ मे च्या रात्री ते सिद्ध झालं. मात्र सामान्य नागरिक म्हणून एक विचार सतत भेडसावत आहे की, नेहमीप्रमाणे सहिष्णुता दाखवून आपण हिंदू आहोत हे सिद्ध करणार का? सामान्यतः मनुष्य लोकेषणा, वित्तेषणा, पुत्रेषणा यामध्ये अडकलेला असतो. सरकार चालवणारे मनुष्यच असतात. त्यामुळे लोकेषणा या अंतर्गत येणारी आंतरराष्ट्रीय एषणा, म्हणजे आंतरराष्ट्रीय दबाव, त्यांना वरील अपेक्षित कारवाई करण्यापासून प्रतिबंध करेल का, असा प्रश्न पडला. त्याचबरोबर आपण काय करू शकतो ? शारीरिक क्षमता नसल्यामुळे प्रत्यक्ष लढाईत सहभागी होऊ शकत नाही. धनाने सहभागी होण्याची सोय नाही. कारण त्यासाठी राष्ट्राचे आर्थिक धोरण ठरविताना भरपूर धनाची व्यवस्था केली जाते, असे वायुदलातील अधिकाऱ्याने सांगितल्यामुळे धनाने सहभागी होण्याचा मार्ग उपलब्ध नाही म्हणून मनाने सहभागी होणे, म्हणजे व्यक्त होणे एवढा एकच पर्याय शिल्लक राहतो. आता एकच मागणी आहे की, कारगिल युद्धाच्या वेळी दाखविलेली सहिष्णुता आता दाखवू नका. 'नापाक' व्याप्त काश्मीर 'पाक' (पवित्र) काश्मीर झाल्याशिवाय थांबू नका.

**वर्षा दामले**/९९२१५३२०३८

### युद्धजन्य परिस्थितीत राजकीय पक्षांची जबाबदारी

सध्या देशात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पृष्ठभूमीवर आपण सर्व भारतीयांनी एकजूट दाखवण्याची गरज आहे. अशा संवेदनशील वेळी राजकीय पक्षांनी जबाबदारीने आणि संयमाने वागणं अपेक्षित आहे. लोकशाहीमध्ये विरोधी मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे, पण जेव्हा देशाच्या सुरक्षेचा आणि जवानांच्या जीवनाचा प्रश्न निर्माण होतो, तेव्हा पक्षभेद विसरून राष्ट्रहितासाठी एकसंध भूमिका घेणं अत्यावश्यक ठरतं. माध्यमांमध्ये राजकीय पक्षांच्या काही निष्काळजी व उत्तेजक विधानांमुळे जनतेमध्ये संभ्रम निर्माण होतो व शत्रुराष्ट्रांना चुकीचा संदेश जातो.

राजकीय नेत्यांनी आपल्या वक्तव्यांमध्ये संयम बाळगावा, समाज माध्यमांवर कोणतीही अपुरी किंवा अपप्रचार करणारी माहिती शेअर करू नये आणि जनतेमध्ये विश्वास व शांती राखण्यासाठी प्रयत्न करावेत. या काळात पक्षीय राजकारण न करता, सरकारच्या आणि लष्कराच्या निर्णयांना पाठिंबा देणं ही खरी देशभक्ती ठरेल. म्हणूनच विनंती आहे की सर्व राजकीय पक्षांनी आणि त्यांच्या नेत्यांनी युद्धजन्य परिस्थितीत फक्त राजकीय नफा-तोटा न पाहता, देशाच्या एकात्मतेसाठी जबाबदारीने वागावं हेच राष्ट्रप्रेम शिकवते.

**हृषीकेश हरदास**/वर्धा

### मानवता आणि सतर्कता यांचा सुंदर मेळ

सहा मेच्या रात्री ऑपरेशन सिंदूर झाले आणि पाकिस्तानचे नऊ लष्करी तळ उद्‌ध्वस्त करण्यात आली. त्याला कोणी युद्ध म्हणाले, कोणी हल्ला मानले

परंतु आदर्श म्हणजे काय याचेच ते खऱ्या अर्थाने पालन होते हे समजून घेणे अगत्याचे आहे. हनुमंतांनी रावणाला जाळले नाही तर फक्त त्याची लंका

जाळली आणि म्हणूनच भारतीय लष्कराने हनुमंताच्या भूमिकेतून कार्य केले आणि जो अमानुष हल्ला झाला होता त्याचे संरक्षणात्मक उत्तर दहशतवाद्यांना दिले तेसुद्धा व्याप्त काश्मीरवर हल्ला करून, म्हणजेच आदर्श जगाला दाखून दिला हा यातून बोध घेणे गरजेचे वाटते. मानवता आणि सतर्कता यांचा सुंदर मेळ या ऑपरेशन सिंदूरमधून बघायला मिळाला. पण त्यावर सुद्धा असंबद्ध भाषणं पत्रकार परिषदेतून करायला काही राजकीय मंडळी चुकली नाहीत हेच या देशाचे दुर्दैव आहे. पण काहीही असो, हा हिशेब देशाला विजयाकडे नेणारा ठरतो हे विसरून चालणार नाही.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### मोदींचे हात बळकट करा

पहलगाम हल्ल्याचा बदला म्हणून भारताने पाकिस्तानातील ९ दहशतवादी तळ उद्‌ध्वस्त केली. त्यानंतर पाकिस्ताननेही युद्धाच्या आवेशात हल्ले सुरू केले आहे. तेव्हा भारत सरकारला पाठिंबा म्हणून सर्व राज्य सरकारांनी फुकट योजना बंद कराव्या. कारण युद्ध किती काळ चालेल याचा आजच अंदाज घेता येणार नाही व युद्धात खूप जास्त खर्च होत असतो.

युद्धाचे वेळी व युद्धानंतर पैशाची मोठ्या प्रमाणात गरज भासत असते. तसेच विदेशात जाणाऱ्या पर्यटकांनी त्यांचा प्रवास थांबवावा. विदेशातला प्रवास म्हणजे मोठ्या प्रमाणावर डॉलरचा खर्च होत असतो. युद्धात व युद्धानंतर डॉलरची देखील आवश्यकता भासणार आहे. भारतातील सर्व नागरिकांनी मोदींचे हात बळकट करण्याकरिता सहकार्य करावे.

**जयंत ओक**/९७६४६४८३८३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# पहिल्या आठवड्यात ४०० कारवाया, १ कोटीहून अधिक मुद्देमाल जप्त

५

## नांदेड परिक्षेत्रात अवैध धंद्याविरोधात अभियान



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मे**

नांदेड परिक्षेत्रात सुरू असलेल्या अवैध दारू, मटका, जुगार, ऑनलाइन लॉटरी, क्रिकेट बॅटिंग, गुटखा, अंमली पदार्थ, वेश्याव्यवसाय, वाळू उपसा व वाहतूक, अवैध प्रवासी वाहतूक इत्यादींना आळा घालण्याकामी व्यापक मोहिमेची आवश्यकता लक्षात घेऊन, दिनांक १ मे पासून म्हणजे महाराष्ट्र दिनापासून परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत ३९, अवैध व्यवसाय विरोधी अभियान-१३९, चे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्याच आठवड्यात परिक्षेत्रात ४०० हून अधिक कारवाया करीत १ कोटीहून अधिक मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर मोहिमेत, पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, अंमलदार यांचेसह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व अपर पोलीस अधीक्षक हे सहभागी झाले आहेत.

त्याचप्रमाणे, स्थानिक गुन्हे शाखा व विशेष पोलीस पथके ही देखील कारवाईत सहभागी झाली असुन, संबंधित जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांनी अवैध व्यवसाय विरोधी कारवायांवर सक्तीने देखरेख ठेवली आहे.

या अनुषंगाने दि.०१.०५.२०२५ ते दि.०७.०५.२०२५ पावेतो नांदेड परिक्षेत्रातील नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर या चारही जिल्हयांत अवैध व्यवसायांविरोधात मटका/ जुगार, गांजा, अवैध दारु, वाळू व इतर संबंधाने कारवाया करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये नांदेड जिल्ह्यात ९७ कारवाया करीत ९८ जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असून ६ लाख ५ हजार ४७८ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. परभणी जिल्ह्यात १०६ कारवाया करीत ११० जणांवर गुन्हे दाखल करून ६० लाख १९ हजार ८१० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. हिंगोली जिल्ह्यात १०२ कारवाया करीत १०२ जणांवर गुन्हे दाखल करीत ३४ लाख २६ हजार ५९० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. लातूर जिल्ह्यात ८९ कारवायांमध्ये ९१ जणांवर गुन्हे दाखल करीत २० लाख २२ हजार २०५ रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

एकुण केसेस आरोपी संख्या चालू महिन्यात दिनांक ०१.०५.२०२५ ते दिनांक ०७.०५.२०२५ पावेतो परिक्षेत्रात अवैध व्यावसायिकांचे विरुद्ध वरीलप्रमाणे एकूण (३९४) केसेस करण्यात आल्या असून एकूण १,२०,७४,०८३ रुपयांचा मुद्येमाल हस्तगत करण्यात आला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने स्थानिक गुन्हे शाखा हिंगोली यांनी पोस्टे हटटा हद्दीमध्ये गांजाची लागवड व साठवणूक विरोधात कारवाई करुन ८७,००० रुपयाचा मुद्येमाल जप्त केला आहे. त्याचप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखा, परभणी यांनी देखील पोस्टे गंगाखेड परिसरातुन ९५,००० रुपयांचा गांजा जप्त करुन चांगली कामगिरी केली आहे. उपरोक्त कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

सदर मोहिमेदरम्यान, सातत्याने अवैध व्यवसाय सुरू ठेवणाऱ्या व्यावसायिकांविरुद्ध तडीपार, एम.पी.डी.ए. व प्रकरण परत्वे मोक्का कायद्याखाली देखील कारवाई करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या असून, सद्या अशा व्यक्तीविरुध्दचे गुन्हे अभिलेख पडताळणीचे काम सुरु आहे. आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाच्या संकेतस्थळावर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी केले आहे.

# हिंगोलीत भारतीय जवानांच्या सुखरूपतेसाठी महादेवाला साकडे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मे**

कश्मीरमधील पहलगाम येथील हल्ल्याचा बदला घेण्याकरीता भारतीय सैन्याने अतिरेक्यांच्या लष्करी तळावर जोरदार हल्ला चढविला. त्यामुळे पाकिस्ताननेही भारतावर क्षेपनास्त्राद्वारे हल्ला चढविला आहे. भारत-पाकिस्तानमध्ये युध्द सुरु असल्याने भारतीय जवान सुखरुप रहावे यासाठी हिंगोली शहरातील भट्ट कॉलनीमधील महिलांनी दि१० मे, शनिवारी कुबरेश्वर महादेवाला साकडे घातले.

पहलगाम येथे निष्पाप २७ पर्यटकांना अतिरेक्यांनी गोळ्या घालून ठार केले होते. त्याचा बदला भारतीय सैन्यांनी सिंदूर ऑपरेशनच्या माध्यमातून घेतला आहे. पाकिस्तानमधील दहशतवाद्यांच्या ९ अड्ड्यांवर क्षेपनास्त्राद्वारे हल्ला चढवून काही अतिरेक्यांना कंठस्थानी घातले. तसेच हे अतिरेकी अड्डे उध्वस्त केले. पाकिस्तानमधील अतिरेकी अड्डे उधवस्त केल्याने पाकिस्तानने देखील भारताला प्रत्युत्तर देवून क्षेपनास्त्राद्वारे हल्ले सुरु केले आहेत. विशेष म्हणजे या ऑपरेशन सिंदूरची माहिती रणरांगीनी कर्नल सोफिया कुरेशी व विंग कंमाडर व्योमीका सिंग ह्या वेळोवेळी देत आहेत.

भारत-पाकिस्तानमध्ये युध्द सुरु असल्याने भारतीय जवान सुरक्षित रहावे यासाठी हिंगोली शहरातील भट्ट कॉलनीतील कुबेश्वर परिवाराच्यावतीने सकाळच्या सुमारास कुबेश्वर महादेवाची पुजा-अर्चा करून साकडे घालण्यात आले. यानंतर उपस्थित महिला, पुरुष, युवक, युवती यांनी हातामध्ये भारतीय ध्वज घेवून घोषणा दिल्या. तसेच पाकिस्तान अतिरेक्यांच्या माध्यमातून चढवित असलेल्या हल्ल्यामुळे निषेध नोंदविण्यात आला.

# आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी यंत्रणांनी सज्ज रहावे- जिल्हाधिकारी गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मे**

आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व यंत्रणांनी पूर्वनियोजन करुन अधिक सतर्क, समन्वय व तत्परतेने काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापनाची बैठक आज आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, प्र.पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, अपर जिल्हाधिकारी अनिल माचेवाड, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.नितीन तडस, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.कैलाश शेळके, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता डी. जी. पोत्रे, शिक्षणाधिकारी प्रशांत दिग्रसकर आदींची उपस्थिती होती.

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्लयानंतर भारताने पाकिस्तानवर हल्ले सुरु केले आहेत. या तणावाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सुरक्षेच्या दृष्टीने खबरदारी घेण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेताना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता म्हणाले, जिल्ह्यात पोलीस विभाग, उपविभागीय अधिकारी, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व महावितरण विभागांनी समन्वयाने मॉकड्रिलची तयारी करावी, अशा सूचना दिल्या.

तसेच आरोग्य विभागानेही सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालय या ठिकाणी पुरेसा औषधी साठा तयार ठेवावा. तसेच शासकीय रुग्णालयाबरोबरच जिल्ह्यातील खाजगी रुग्णालयाची माहिती तयार ठेवावी. पुरेसा रक्त पुरवठा उपलब्ध करुन ठेवावा. तसेच सीपीरची, जनरेटरची व्यवस्था करावी. जिल्हा परिषदेने आपल्या अंतर्गत येणाऱ्या आरोग्य विभागासह इतर संबंधित विभागांमध्ये समन्वय राखण्याचेही यावेळी जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी सांगितले. प्रत्येक गावात नोडल अधिकारी नेमावेत. त्यांच्यासोबत योग्य समन्वय ठेवावा. सर्व कार्यान्वीन यंत्रणेचे संपर्क क्रमांक अद्यायावत करावेत. आपत्तीजनक परिस्थितीत नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी शाळा, मंगल कार्यालयाची माहिती तयार ठेवावी. पुरेसा धान्य पुरवठा व इंधन पुरवठा तयार ठेवावा. जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करावी. जिल्ह्यातील महत्वाच्या पदांवर विशेषतः आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागांतील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द कराव्यात. जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करावी. चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करावी. नागरिकांना परिस्थितीबाबत अद्ययावत व खरी माहिती पोहोचविण्यासाठी ग्रामस्तरावर नोडल अधिकारी नेमून त्यांच्यामार्फत जनजागृती करावी. केंद्र सरकारच्या 'युनियन वॉर बुक चे सखोल अध्ययन करीत सर्वांना त्याची माहिती द्यावी.तसेच मान्सूनमध्ये उद्भवणाऱ्या विविध आपत्तींचा आपणांस सामना करावा लागणार आहे. हे लक्षात ठेवूनच सर्व यंत्रणांनी पूर्वनियोजन करावे आणि सतर्क राहावे. यासाठी उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापन करुन त्यांनी आपत्ती व्यवस्थापनाचा आराखडा तयार करावा. या आराखड्यात जिल्ह्यातील पूरप्रवण गावांचा सर्व नियोजनासह समावेश करावा. पोलीस प्रशासनाने पोलीस स्टेशननिहाय अधिकाऱ्यांचे नाव व भ्रमणध्वनी याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कार्यालयास विहित नमुन्यात सादर करावी. तसेच तालुकानिहाय तयार करण्यात आलेले शोध व बचाव पथक अद्ययावत करुन नेहमी सतर्क ठेवावे. तसेच पाटबंधारे विभागाने जिल्ह्यातील पूरप्रवण गावाला भेटी देऊन भविष्यात पूर येणार नाही, यासाठी उपाययोजनांची माहिती घेऊन तशा उपाययोजना कराव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी यावेळी दिल्या.

# बिंदू माधव जोशी स्मृती दिनानिमित्त अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मे**

ग्राहक पंचायत महाराष्ट्र हिंगोली जिल्हा शाखेच्या वतीने ग्राहक चळवळीचे प्रणेते स्व.नामदार बिंदू माधव जोशी ह्यांच्या स्मृती दीना निमित्त १० मे रोजी अभिवादन सभा घेण्यात येवून बिंदू माधव जोशींचे छायाचित्र असलेल्या कॅलेंडरचे वितरण करण्यात आले. सर्वप्रथम ग्राहक तीर्थ स्व. बिंदू माधव जोशी ह्यांच्या प्रतीमेस जिल्हाध्यक्ष ड आर एन अग्रवाल यांचेहस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले.तदनंतर पदाधिकारी पत्रकार डॉ.विजय निलावार, एस बी रांजुलवार, अॅड शोएब, वामनराव टाकलगव्हानकर, एम एम राऊत, परसराम हेंबाडे, व्हीं पी फुलतांबकर आदींनी पुष्पांजली अर्पण केली.

प्रास्ताविकात पत्रकार डॉ विजय निलावार ह्यांनी स्व.बिंदू माधव जोशी यांनी आजीवन ग्राहक कल्याणकारी कार्य करून ईतीहास नोंदवला असे म्हंटले.विशेष म्हणजे ग्राहक संबंधी चळवळ, त्यांचे अधिकार, कायदा, जागृती, प्रबोधन, ग्राहक संरक्षण परिषदची आयुधे कायदेशीर सविनय पद्धतीने वापरून ग्राहक पंचायत महाराष्ट्र ला राजमान्यता, लोकमान्यता मिळवून दिली. असे जिल्हाध्यक्ष अॅड आर एन अग्रवाल म्हणाले. ग्राहक चळवळीचे जनक भीष्म पितामह, साधकांवर पुत्रवत प्रेम करणारे पूजनीय ग्राहकतीर्थ बिंदूमाधव जोशी नानांच्या स्मृतीस नमन करण्याचा हा स्मृती दीन पथदर्शक ठरतो असे उदगार एस बी रांजुलवार यांनी काढले.

ग्राहकांचे हक्कासाठी शासन आणि ग्राहक ह्यांच्यात संवाद साधुन ग्राहक पंचायत महाराष्ट्र च्या माध्यमातून कर्तव्य आणि जागृती करण्यासाठी स्व.बिंदू माधव जोशी नी दिलेले धडे अंगीकृत करणे हीच खरी त्यांना आदरांजली आहे अश्या आशयाचे उदगार एम एम राऊत व परसराम हेंबाडे ह्यांनी काढून सर्वांनी दोन मिनिट स्तब्ध होवून श्रदांजली अर्पण केली. उपस्थितांना स्व.बिंदू माधव जोशी ह्यांचे छायाचित्र असलेल्या कॅलेंडरचे वितरण करण्यात आले. संचालन वामनराव टाकळगव्हाणकर तर आभार अॅड शोएब ह्यांनी मानले

# आज व्यंकटेश नेत्रालयात डायबिटीज रेटीनोपॅथी तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मे**

येथील नाईक नगर भागात असलेल्या डॉ. लखमावार यांचे हिंगोली शहरासह परिसरात एकमेव असलेले आधुनिक मशीन युक्त सुसज्ज असे रेटिना केअर सेंटर व्यंकटेश नेत्रालय फॅक्रो अँड रेटिना केअर सेंटर मध्ये डायबेटिक रेटीनोपॅथी मोफत तपासणी शिबिर रविवारी ११ मे रोजी सकाळी १० ते ३ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे. या मोफत तपासणी शिरीरात सवलती मध्ये उपचार केले जाणार असल्याचे नेत्ररोगतज्ञ डॉ. किशन लखमावार, डॉ.प्रतीक ज्योतस्ना किशन लखमावार यांनी केले आहे.

हिंगोली शहरातील अत्याधुनिक मशीनयुक्त असलेले सुसज्ज असे रेटिना केअर सेंटर डॉ. लखमावार यांचे व्यंकटेश नेत्रालय जिल्हाधिकारी कार्यालय समोर नाईक नगर येथे ११ मे रोजी रविवारी सकाळी ११ ते ३ या वाजेपर्यंत डायबेटिक रेटीनोपॅथी मोफत तपासणी शिबिर व सवलती मध्ये उपचार केले जाणार आहेत. डायबेटिक रेटीनोपॅथी डायबिटीजमुळे डोळ्यांच्या रेटीनाला अर्थात डोळ्यात मागील भागाला होणारी हानी आहे. त्यामुळे रक्तवाहिन्या खराब होऊन गळती होऊ शकते किंवा बंद होऊ शकतात ज्यामध्ये दृष्टी कमी होऊ शकते आणि अंधत्व येऊ शकते. भारतात डायबिटीजचे प्रमाण जास्त असल्याने ही प्रमुख अंधत्वाची कारणे आहेत. डायबेटिक रेटिनोपॅथीच्या सुरुवातीच्या टप्प्यात कोणतेही लक्षणे दिसत नाहीत.नियमित तपासणीमुळे ही अवस्था लवकर ओळखली जाऊ शकते, ज्यामुळे दृष्टी गमावण्याचा धोका कमी होतो. यावर प्रभावी उपाय म्हणून लवकर निदान झाल्यास लेझर फोटोकॉग्लुशेन, इंजेक्शन किंवा शस्त्रक्रिया यासारख्या उपचारानी दृष्टी वाचविता येते हिंगोली जिल्ह्यातील कोणत्याही व्यक्तींनी नियमित डोळ्याची तपासणी करून घ्यावी त्यामध्ये डायबिटीज असलेल्या सर्व व्यक्ती यामध्ये डायबेटी डायबेटीज च्या प्रकार एक किंवा दोन प्रत्येकाने दरवर्षी डोळ्याची तपासणी करावी, डायबिटीज असलेल्या गर्भवती महिलांनी गर्भधारणेच्या पहिल्या पहिल्या तिमाही आणि संपूर्ण गर्भावस्थेत नियमित तपासणी करावी, ज्यांना डायबिटीज दीर्घकाळ आहे. रक्तदाब कोलेस्ट्रॉल जास्त आहे किंवा धूम्रपान करतात त्यांनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. या डायबिटीज रेटिनोपॅथी मोफत तपासणी शिबिरात नेत्ररोगतज्ञ डॉ. किशन द. लखमावार, डॉ.प्रतिक लखमावार आदी तज्ञ डॉक्टर तपासणी करून उपचार करणार आहेत. ही तपासणी सवलतीच्या दरामध्ये केली जाणार असून नोंदणी फीस फक्त नाममात्र शंभर रुपये ठेवण्यात आली आहे. हिंगोली जिल्ह्यातील डायबिटीज रेटीनोपॅथी असलेल्या सर्व व्यक्तींनी तपासणी करून घ्यावी असे आवाहन नेत्ररोगतज्ञ डॉ.किशन लखमावार व डॉ. प्रतीक लखमावार यांनी केले आहे.

# राणीसती मंदिरात सात दिवस योग शिबीराचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मे**

येथील गंगा नगर भागातील राणीसती मंदिरात पतंजली योग समिती, भारत स्वाभिमान ट्रस्ट, महिला पतंजली योग समिती, युवा भारत, किसान सेवा समिती, पतंजली सोशल मिडीया यांच्या संयुक्त विद्यमाने दि १० मे ते १६ मे पर्यंत सकाळी ५ ते ७ या वेळत योग, ध्यान तसेच प्राणायाम शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबीरात सुर्य नमस्कार, योगाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. १० मे रोजी सकाळी ५ वाजता या शिबीराला प्रारंभ झाला असून या शिबीरामध्ये मोठ्या संख्येने नागरिक, युवक, युवती तसेच लहान मुले, मुली सहभागी होत आहे. पतंजली समितीच्यावतीने शहरातील विविध भागात योग शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहेत.

# मदीना चौक येथील भीषण अपघातानंतरही प्रशासनाला जाग येईना

**नवीद अहेमद**
**वसमत, १० मे**

मागील आठवड्यात अवैध माती वाहून नेणाऱ्या हायवा वाहनाने शहरातील मदिना चौक येथे असलेल्या ऑटोला चिरडले त्यामध्ये दोघे जागीच ठार झाले होते तर तिघांची प्रकृती गंभीर होती. सदरील प्रकार घडल्यानंतरही पोलीस विभाग, महसूल विभाग व राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत कुठल्याच प्रकारची दखल घेण्यात आली नसल्याचे पहावयास मिळत आहे.

येथील महामार्गावर कुठल्याच प्रकारचे दिशा व वाहन चालकासाठी कुठल्याही प्रकारचे सांकेतिक चिन्ह तसेच सूचनाफलक लावण्यात आलेले नाही व रोडवर डेली नायटर, रोड स्टड तसेच रोड मार्किंग नसल्यामुळे अशा घटना घडत आहेत. तत्कालीन पोलीस अधीक्षक सुधीर दाभाडे यांच्या कार्यकाळात मदिना चौक येथे पोलीस चौकी होती सध्या पोलीस चौकी नसल्याने येथे अपघाताच्या प्रमाणासह टवाळखोर ऑटो चालक यांच्यामुळे शाळकरी व महाविद्यालयीन मुलींना यांच्या त्रासांना सामोरे जावे लागत आहे. या भागात महसूलच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कार्यालय असून देखील या ठिकाणी बेकायदेशीररित्या शहराच्या मधोमध वीट भट्ट्या सुरू आहेत. या वीटभट्ट्या नेमक्या कुठल्या अधिकाऱ्याच्या आशीर्वादाने चालत आहे. वीटभट्ट्यासाठी माती घेऊन जाणारा हायवा वाहन होता. ज्याने निष्पाप मुलांचे जीव घेतले एवढी मोठी घटना घडूनही अधिकाऱ्यांनी कुठलीच पावले उचलली नसल्यामुळे लोकांमधून संताप व्यक्त होत आहे. महसूलच्या बोगस पावत्या व त्यात जाणारे अवैधरित्या माती आणि आणि क्षमतेपेक्षा जास्त मालवाहतूक करणारे वाहन हे तपासण्याचे काम आरटीओला असतानाही आरटीओ मात्र जिल्ह्याच्या खुर्चीवर बसून कार्य पाहत आहे. शहरातील मदिना चौक येथे दोन समाजाचे शमशानभूमी शाळा, महाविद्यालय, मंगल कार्यालय, महापुरुषांची पुतळे, देवी देवतांची मंदिरे आहेत. पूर्वीची पोलीस चौकी पुन्हा सुरू करण्यात आली तर येणारा काळात अशी घटना होणार नाही. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील. विविध पक्षाची नेते राजकीय मंडळी यांनी हजेरी लावली होती परंतु मृत्यांच्या कुटुंबाला कुठलीच मदत घोषित केली नाही. खुलेआम वीरभट्ट्या पेटत असताना त्याचे होणारे प्रदूषण हे फक्त मानवी जीवनावरच होत नसून याचा परिणाम पर्यावरणावर होत आहे. हे वीट भट्टी पेटवण्यासाठी लागणारे लाकूड कुठून उपलब्ध होते याचा विचार वन विभागाने करणे गरजेचे आहे. वसमत तालुक्यातील महसूल सह वन विभाग, पोलीस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, येथील वरिष्ठ अधिकारी यांनी गांभीर्याने विचार करून अशा घटना टाळण्यासाठी उपाययोजना करण्याची गरज जनतेतून होत आहे.

# गंगा नगर येथे अखंड हरिनाम सप्ताहाला सुरूवात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० मे**

शहरानजीक असलेल्या गंगा नगर कारवाडी येथील हनुमान मंदिरात दि ८ मे पासून अखंड हरिनाम सप्ताहाला सुरूवात झाली असून यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन सात दिवस करण्यात आले आहे. सकाळी ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी १ ते ४ भागवत कथा, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ८ ते १० हरिकिर्तन आणि रात्री पंचक्रोशीतील गुणीजन भजनमंडळाचा हरिजागर असे कार्यक्रम होत आहेत. भागवत कथाकार ह भ प प्रकाश महाराज जाधव केंद्रेकर हे असून ज्ञानेश्वरी व्यासपीठ ह भ प रामधन महाराज चव्हाण यांचेकडे आहे. दि ८ मे रोजी हभप पद्माकर महाजरा केदारे पिंपरखेड, दि ९ मे रोजी हभप श्रीनिवास महाराज घुगे हिंगणी, दि १० मे रोजी हभप अशोक महाराज तळणीकर, दि ११ मे रोजी हभप वैराग्यमूर्ती शिवा महाराज शिवणीकर, दि १२ मे रोजी हभप रमेश महाराज जामकर लासीना, दि १३ मे रोजी हभप नारायण महाराज समगेकर, दि १४ मे रोजी हभप प्रसाद महाराज गडदे आळंदीकर यांचे किर्तन होणार असून दि १५ मे रोजी हभप भिकाजी महाराज कोकाटे यांचे सकाळी ११ ते १ पर्यंत काल्याचे किर्तन आणि त्यानंतर महाप्रसादाचा लाभ मिळणार आहे. या सोहळ्यास जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन समितीने केले आहे.

सं क्षि प्त

## मंठा तालुक्यात चाललेला वाळू माफियांचा उच्छाद थांबणार का ?

### सर्वसामान्य नागरिकांना पडलेला प्रश्न

**जिल्हा महसूल प्रशासन, जिल्हा पोलीस प्रशासनासह आर. टी . ओ . यांचे दुर्लक्ष**

**तभा वृत्तसेवा**
**प्रतिनिधी / प्रतिनिधी**

मंठा तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर चोरून वाळू विकण्याचा प्रकार समोर येत असून, मंठा तालुका व लोणार , जिंतूर या भागातील वाळू चोरट्या मार्गाने पुरवठा केला जात असल्याची तक्रार मंठा तालुक्यातील मधील नागरिक करत आहेत

जिल्हाभरात वाळूचे लिलाव झालेली नसताना मंठा तालुक्यातील पूर्णा नदी पात्रातून मोठ्या प्रमाणावर चोरटी वाळू तालुक्यासह बाहेरच्या जिल्ह्यामध्ये पाठवली जात असल्याचे अनेक नागरिकांचे म्हणणे असून , सर्वसामान्य नागरिकांना आपल्या घरासमोरून जाणारे मोठमोठे हायवा भरधाव वेगाने अनेक गावांच्या मधून जातात त्यामुळे खूप मोठा त्रास या हळव्यांच्या इजा करण्यामुळे होत असून ज्या नदीमधून वाळू उपसा केला जातो त्या पूर्णपात्रात मोठ मोठाले खड्डे पडले असून , महसूल विभाग मात्र याकडे डोळेझाक करत असल्याचा आरोप सर्वसामान्य जनतेमधून केला जात आहे जिल्हाधिकारी महोदयांचे या संपूर्ण बाबीकडे दुर्लक्ष असून, महसूल विभागातील तहसीलदार नायब तहसीलदार मंडळ अधिकारी तलाठी फक्त हप्ते खोरी करत असून त्यामुळे वाळू माफियांचे चांगलीच फावले असल्याची भावना सर्वसामान्य जनता व्यक्त करीत आहे जिल्हा प्रशासन व महसूल प्रशासन या वाळू माफियांकडे साप दुर्लक्ष करत असून यासंदर्भामध्ये आर्थिक देवाणघेवाण होत असल्याचा आरोप सर्वसामान्य नागरिक करीत आहेत त्यामुळे जिल्हाधिकारी महोदयांनी या गोष्टीकडे लक्ष देण्याची गरज असून त्यांनी आपल्या डोळ्यावर लावलेली पट्टी आठवत सर्वसामान्य नागरिकांना या त्रासापासून वाचवावे असेही अनेक नागरिकांचे म्हणणे आहे.

## गोद्री येथे घाणीचे साम्राज्य गावातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात

### ग्रामपंचायतचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन / प्रतिनिधी**

तालुक्यातील गोद्री येथे घाणीचे साम्राज्य पसरल्याने गावातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.नाली अभावी प्रत्येकांच्या घरासमोर ठिकठिकाणी पाणी साचल्याने काही ठिकाणी तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे.तसेच स्वच्छता केवळ नावाला राहिली असल्याचे चित्र दिसून येत आहे.गावात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरल्याने साथीचे रोग पसरत आहे.अनेक नागरीकांना साथीच्या आजारांना तोंड द्यावे लागत आहे.भविष्यात नागरीकांना गंभीर आजार होण्याची भितीही व्यक्त होत आहे.याकडे ग्रामपंचायत जाणिवपूर्वक दुर्लक्ष करतांना दिसत आहे.प्रत्येक गल्लीत जागोजागी कचरा व पाण्याचे डबके साचले असून,नाल्या तूंबलेल्या आहेत . नागरीकांना रस्त्यावर चालणे कठीण झाले असून दुर्गंधीही सुटल्याने मोठा त्रास सहन करावा लागत आहे.घाणीमुळे नागरीकांना साथीच्या आजारांना सामोरे जावे लागत आहे.ग्रामपंचायतीच्या दर्लक्षामुळे साथीच्या आजारांना निमंत्रण मिळत असल्याने याचे दुष्परिणाम मात्र गावातील जनतेला भोगावे लागत आहे.वरिष्ठांनी याकडे तात्काळ लक्ष घालावे अशी मागणी ग्रामस्थांनाकडून होत आहे.



## जिल्हा संसाधन व्यक्ती कामांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

आत्मनिर्भर भारत पॅकेज अंतर्गत प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य उद्योग उन्नयन या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत राज्य नोडल एजन्सीच्यावतीने जिल्हास्तरावर लाभार्थ्यांना पाठपुरावा, हाताळणी सहाय्य देण्यासाठी संसाधन व्यक्तींची नामिकासूची तयार करावयाची आहे. त्यासाठी कृषि विभागामार्फत या योजनेच्या मार्गदर्शक सूचनेतील अटी व शर्तीनुसार बंद लिफाफ्यातून अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदाकरीता शिक्षण-पदवीधर (कोणत्याही शाखेचा ) वयाची अट नाही, सविस्तर प्रकल्प अहवाल (ढ्झ) बनविण्याचा अनुभव, अर्ज सादरीकरण, बँक मंजूर पद्धती, प्रक्रिया व अन्नप्रक्रियेतील अत्याधुनिक तंत्रज्ञान इत्यादींची माहिती असणाऱ्यांना व स्थानिकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. या पदाकरिता दि.१५ मे पर्यंत अर्ज सादर करावयाचे आहेत. योजनेच्या मार्गदर्शक सूचना, अर्जाचा नमुना, सविस्तर पात्रता परिश्रमिक (मानधन) व इतर अटी शर्ती या जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय जालना येथे तसेच कृषी विभागाच्या् .ज्ञॲळीहळ.ारहरॲरीहींॲर.सीं.ळप या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या पदासाठी संस्था पात्र असणार नाहीत, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जालना यांनी कळविले आहे.

# पाकिस्तान विरोधात 'ऑपरेशन सिंदूर' लॉन्च करून भारताने पाकिस्तान मधील दहशतवाद्यांच्या खात्मा केल्यामुळे भाजपा जालना च्या वतीने जल्लोष

तभा वृत्तसेवा
जालना /प्रतिनिधी

जम्मू काश्मीर येथील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी २२ एप्रिल रोजी हल्ला केला होता. या हल्ल्यात २७ जणांचा मृत्यू झाला. या हल्ल्यात अनेक पर्यटक गंभीर जखमी झाले आहेत. या भीषण हल्ल्यामुळे जम्मू काश्मीरसह संपूर्ण देशात हळहळ व्यक्त केली जात आहे. या हल्ल्यात महाराष्ट्रातील काही पर्यटकांचा मृत्यू झाला. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या बदला म्हणून पाकिस्तान विरोधात 'ऑपरेशन सिंदूर' लॉन्च करून भारताने पाकिस्तान मधील दहशतवाद्यांच्या खात्मा केल्यामुळे भारतीय जनता पार्टी जिल्हा जालना च्या वतीने (ता.०८) फटाके फोडून व पेढे, लाडू वाटून जल्लोष साजर करण्यात आला.

यावेळी जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत, विजय कामड, सौ.विमलताई आगलावे,राजेश राऊत,अशोक आण्णा पांगारकर, सोपान पेंढारकर, सौ.संध्याताई देठे, चंपालाल भैय्या भगत, सिद्धिविनायक मुळे, अर्जुन गेही, धनराज काबलिये, राजेंद्र भोसले, सुनील भैया खरे, शिवराज जाधव, अमोल कारंजेकर, अमोल धानुरे, बाबासाहेब कोलते, रवींद्र अग्रवाल, जगदीश येनगुपटला, वसंतराव शिंदे, सोमनाथ गायकवाड, आनंद झारखंडे, डोंगरसिंग साबळे, इम्रान सय्यद, सुहास मुंडे, योगेश लहाने, निवृत्ती लंके, सुदर्शन काळे, शिवाजी महाराज गवारे, सुखदेव महाराज गोरे, हरिभाऊ गोरे, नेमिनाथ बागल, विकास कदम, उमेश पेंढारकर, दत्ताभाऊ गारखेडे, भगवानराव शिंदे, संजय माधवले, गौरव गोधेकर, शाम उगले, नितीन कायंदे, तुकाराम बखळे, पवन मुंडे, राहुल जाधव, ओम कळकुंबे, महेश मुळे, अनिल यशवंते, ऋषीकेश खटके, रोहित नलावडे, दौलत भुतेकर, भगवान शिंदे, वेंकटेश गंडाळ, माणिक फड, दीपक सोनुने आदींसह मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# परतुर शहरा मध्ये प्रथमच मोठ्या उत्सहात जगतज्योती महात्मा बशवेश्वर यांची भव्य मिरणुक काढण्यात आली



**परतुर / प्रतिनिधी**

परतुर येथे जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या ८९४ व्या जंयती निम्मीत परतुर येथील रामेश्वर मंदीरात सकल लिंगायत समाजा च्या वतीने प्रा तिरमुखे यांच्या व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असता या वेळी प्रा रामेश्वर तिरमुखे यांणी महात्मा बसवेश्वर यांणी समाजा तील स्त्री पुरुष समानता सर्व जाती धर्म समभाव करिता काम केल तसेच सर्व जाती धर्मांना सोबत घेत देशातील बाराव्या शतकातील पहिली संसद भरवण्याचे काम केली तसेच त्यांणी जगतज्योती महात्मा बरावेश्वर यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकताना महात्मा बसवेश्वरांनी लोकशाहीची संकल्पना जी अनुभव मंटपाच्या माध्यमातून १२ व्या शतकामध्ये जगासमोर मांडली त्या समता , समानता स्त्री पुरुष समानता ही लोकशाहीची मूल्य आजही समाजामध्ये रुजवण्याची गरज आहे असे त्यांनी सांगितले.दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमात पहिल्या दिवशी सकाळ सत्रात क्रांतीसुर्य महात्मा बसेश्वर यांच्या जयंतीदिनी क्रांतीसुर्य महात्मा बसवेश्वर चौक या ठिकाणी महात्मा बसेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तर दुपार सत्रामध्ये रेल्वे स्टेशन उड्डाणपूल ते रामेश्वर मंदिर गाव भाग परतुर या ठिकाणापर्यंत भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये समाजातील स्त्री या पुरुष, मुले ,मुली , ज्येष्ठ व्यक्ती या सर्वांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला या शोभा यात्रेचा समारोप रामेश्वर मंदिर या ठिकाणी करण्यात आला. दुसऱ्या दिवशी दुपार सत्रामध्ये क्रांतीसुर्य महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनावर आधारित व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ते प्रा. रामेश्वर तिरमुखे ( छत्रपती संभाजी नगर ) हे होते तर अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. संतोष पोपडे ( संत तुकाराम महाविद्यालय परभणी) हे होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोमनाथ आपा पांगारकर यांनी केले तर कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून प्रा. विनोद वीर ( संचालक मंगलनाथ मल्टीस्टेट जालना), श्री राजेंद्र वांजुळे( सरपंच चितळी, पुतळी,) श्री काळे , श्री राजेश भोसले यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सकल लिंगायत समाज परतूर यांनी अथक परिश्रम घेतले. उपस्थितांचे आभार ओम आप्पा कानडे यांनी मानले.

## हिंदू क्रांतीसूर्य महाराणा प्रताप सिंह यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

आज राजस्थान मधील मेवाडचे राजे महाराणा प्रताप सिंग यांच्या जयंतीनिमित्त लोधी मोहल्ला व माता मम्मा देवी मंदिर चौक येथील पुतळयास पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विधानसभा प्रमुख श्री.भास्कर आबा दानवे, सरचिटणीस श्री.सिद्धिविनायक मुळे , मंडळ अध्यक्ष श्री.अमोल धानूरे, श्री.सुनिल खरे, श्री.देविदास देशमुख, कृष्णा गायके, उद्धव ढवळे, सोमेश काबलीये, सेवकलाल नारियालवाले, लक्ष्मण वर्मा, बालाजी राजपूत, शिव राऊत, विराट नामदे, सागर धानुरे, कार्तिक राऊत, दुर्गेश वरखते आदीसह उपस्थिती होती.

# लिंबेवडगावातील प्रकल्पग्रस्तांना आ. लोणीकरांच्या शुभहस्ते पुनर्वसनअनुदानाचे धनादेश वाटप

**तभा वृत्तसेवा**
**प्रतिनिधी / प्रतिनिधी**

मंठा, दि. ०८ मे २०२५: पाटोदा साठवण तलाव अंतर्गत बुडीत क्षेत्रातील लिंबेवडगाव (ता. मंठा) येथील प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन अनुदान, स्थलांतरण भत्ता यांचे प्रतिनिधिक स्वरूपात धनादेश वाटप गुरुवारी तहसील कार्यालय मंठा येथे महाराष्ट्राचे माजी मंत्री आणि परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते संपन्न झाले. आमदार लोणीकर यांनी येत्या ८ दिवसांत अनुदानाची रक्कम प्रकल्पग्रस्तांच्या बँक खात्यात जमा करण्यासाठी संबंधित यंत्रणेला आदेश देण्याची ग्वाही दिली. तसेच, प्रकल्पग्रस्तांच्या तक्रारींच्या अनुषंगाने भूमी अभिलेख कार्यालयाच्या अधिकाऱ्यांना पुन्हा मोजणी करून तक्रारींचे निराकरण करण्याचे निर्देश देण्याचे आश्वासन दिले. झोपडपट्टीतील प्रकल्पग्रस्तांना नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्याची हमीही त्यांनी दिली. महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री परतुर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून बळीराजा कृषी संजीवनी योजनेअंतर्गत पाटोदा साठवण तलाव अंतर्गत बुडीत क्षेत्रातील लिंबेवडगाव (ता. मंठा) येथील प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन अनुदाना करीता २५० कोटी रुपये मंजूर झाले होते. याकरिता आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. पाटोदा साठवण तलाव अंतर्गत बुडीत क्षेत्रातील लिंबेवडगाव (ता. मंठा) येथील प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन अनुदान, स्थलांतरण भत्ता यांचे प्रतिनिधिक स्वरूपात धनादेश वाटप झाल्याने लिंबेवडगाव गावातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून. गावकरी बांधवांनी आमदार बबनराव लोणीकर यांचे आभार व्यक्त केले आहे. या कार्यक्रमाला भाजपा चे प्रदेश सदस्य सतीशराव निर्वळ, अजित दादा पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विधानसभा प्रमुख भाऊसाहेब गोरे, भाजपा विधानसभा प्रमुख गणेशराव खवणे, युवा नेते संदीप भैया गोरे, कैलासराव बोराडे, पंजाबराव बोराडे, कल्याण खरात, भाजपा युवा मोर्चा तालुका अध्यक्ष विलास घोडके, नगरसेवक दवणे, माऊली घोंडगे, आनंद जाधव, कैलास चव्हाण, राजेभाऊ खराबे, दत्तराव खराबे, गणेश चव्हाण, सोपान खरात, बंडू खरात, श्रीराम जाधव, बाबासाहेब देशमुख, परमेश्वर शिंदे, योगेश हावळे सतीश खरात, विठ्ठलराव कदम, रावसाहेब ढवळे पांडुरंग चव्हाण, वैभव नरवडे, अभिजित कोदंडे,परतूरचे उपविभागीय अधिकारी, मंठाचे तहसीलदार, कार्यकारी अभियंता रोहित देशमुख, उपविभागीय अधिकारी आर. व्ही. शेळके, कनिष्ठ अभियंता एस. व्ही. ताडे आणि लिंबेवडगाव येथील प्रकल्पग्रस्त उपस्थित होते.



# विचारांची क्रांती शब्दांतून घडते,

## आणि ती व्याख्यानमालेतून रूजते - अरविंद देशमुख

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

तथागत गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानमाला ''विचारांची क्रांती शब्दांतून घडते, आणि ती व्याख्यानमालेतून रूजते! ज्ञान, करुणा आणि समतेचा संदेश देणाऱ्या तथागत भगवान गौतम बुद्धांच्या जयंतीनिमित्त जालना येथील स्वामी विवेकानंद हायस्कूलच्या प्रांगणात भीमराज प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित व्याख्यानमातेला सुरुवात झाली. इतिहास तज्ञ प्रा. डॉ. शीमंत कोकाटे यांनी व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफले. अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. व्याख्यानमालेचे उद्घाटन ज्येष्ठ समाजसेवक ॲड. बी.एम. अण्णा साळवे यांच्याहस्ते झाले. अध्यक्षस्थानी सुदामराव सदाशिवे (माजी समाजकल्याण सभापती,



जि.प. जालना) व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बळीराम बागल, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, पॅंथर्स संदीप खरात (माजी नगरसेवक) तसेच कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष जयंत भोसले, आयोजक प्रकाश भोरे, राहुल गंगाधरे, देवेंद्र मोरे, विलास भिंगारे आणि मार्गदर्शक बंडू सुरडकर, कैलास मगरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाला आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. भगवान बुद्धांचे तत्त्वज्ञान म्हणजे शांततेचा मार्ग, विज्ञाननिष्ठ विचार आणि सर्वसामान्यांच्या उत्थानाची दिशा. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन समाजात परिवर्तन घडवण्याचा हा प्रयत्न निश्चितच उल्लेखनीय आहे.

## भक्ती बबनराव लोणीकरची ऐतिहासिक कामगिरी ; इंडिया डिझाइन वीक २०२५ साठी भक्ती लोणीकर ची डिझाइन निवड

इटलीतील मिलान येथील प्रतिष्ठित इन्स्टिट्यूटो मरांगोनी मध्ये भक्ती लोणीकर ने पटकावला प्रथम क्रमांक

तभा वृत्तसेवा
प्रतिनिधी / जालना

महाराष्ट्राचे माजी मंत्री आणि परतुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांची सुपुत्री भक्ती बबनराव लोणीकर यांनी इटलीतील मिलान येथील प्रतिष्ठित इन्स्टिट्यूटो मरांगोनी मध्ये प्रथम क्रमांक मिळवून आपल्या प्रतिभेचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या कठोर परिश्रम आणि अनोख्या डिझाइन दृष्टिकोनाने सर्वांचे लक्ष वेधले आहे. याशिवाय, भक्ती आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षण घेऊन भारतात आपल्या डिझाइनची ओळख करून देणे, ही भक्ती बबनराव लोणीकर हिची मोठी उपलब्धी आहे. 'डिझाइन वीक २०२५' मध्ये तिच्या उत्पादनाला कसा प्रतिसाद मिळतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भक्तीच्या या यशस्वी वाटचालीसाठी आणि तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी जालना जिल्ह्यातील हजारो नागरिक शुभेच्छा देत आहेत. इन्स्टिट्यूटो मरांगोनी हे इटलीतील



यांनी डिझाइन केलेले एक खास उत्पादन भारतातील सर्वात मोठ्या डिझाइन इव्हेंटपैकी एक असलेल्या इंडिया डिझाइन वीक २०२५ साठी निवडले गेले आहे. या दुहेरी यशामुळे भक्ती बबनराव लोणीकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या या कामगिरीने महाराष्ट्राचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले आहे. इंडिया डिझाइन वीक हे भारतातील नवोदित आणि अनुभवी डिझायनर्ससाठी एक अत्यंत महत्त्वाचे व्यासपीठ आहे, जिथे नाविन्यपूर्ण आणि सर्जनशील उत्पादने जगासमोर सादर केली जातात. भक्ती बबनराव लोणीकर हिच्या डिझाइनची या प्रतिष्ठित सोहळ्यासाठी निवड होणे, हे तिच्या सर्जनशीलता आणि डिझाइनमधील अप्रतिम कौशल्याचा पुरावा आहे. मिलान शहरात स्थापित, फॅशन, डिझाइन आणि कला क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त शिक्षण संस्था आहे. १९३५ मध्ये ज्युलिओ मरांगोनी यांनी स्थापन केलेली ही संस्था आज फॅशन आणि डिझाइन शिक्षणातील अग्रगण्य नावांपैकी एक आहे. या संस्थेची शाखा मिलान, फ्लॉरेन्स, पॅरिस, लंडन, दुबई, मुंबई आणि शांघाय यासह अनेक जागतिक शहरांमध्ये आहेत. इन्स्टिट्यूटो मरांगोनी फॅशन डिझाइन, फॅशन बिझनेस, फॅशन स्टायलिंग, इंटिरिअर डिझाइन, प्रॉडक्ट डिझाइन, व्हिज्युअल डिझाइन आणि कला यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये अभ्यासक्रम ऑफर करते. यामध्ये डिप्लोमा, बॅचलर, मास्टर आणि शॉर्ट-टर्म कोर्सेस यांचा समावेश आहे. अभ्यासक्रम हे उद्योगाच्या गरजा आणि नवीनतम ट्रेंड यांना अनुसरून डिझाइन केलेले असतात. दरवर्षी आयोजित होणाऱ्या फॅशन शो आणि प्रदर्शनांमुळे विद्यार्थ्यांना त्यांचे काम जागतिक व्यासपीठावर सादर करण्याची संधी मिळते. इन्स्टिट्यूटो मरांगोनीने जगभरातील अनेक यशस्वी डिझायनर्स आणि फॅशन व्यावसायिक तयार केले आहेत. भक्ती बबनराव लोणीकर यांनी या संस्थेत प्रथम क्रमांक मिळवून आणि 'इंडिया डिझाइन वीक २०२५' साठी निवड होऊन या संस्थेची प्रतिष्ठा आणखी उंचावली आहे. मिलानमधील कॅम्पस अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज आहे, ज्यामध्ये डिझाइन स्टुडिओ, लायब्ररी, आणि तंत्रज्ञान-आधारित लॅब्स यांचा समावेश आहे. तेथील वातावरण सर्जनशीलता आणि नवोन्मेषाला प्रोत्साहन देते, जे विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनांना प्रत्यक्षात आणण्यास मदत करते. इन्स्टिट्यूटो मरांगोनीची मुंबई येथे शाखा आहे, जी भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण स्थानिक पातळीवर घेण्याची संधी देते. भक्ती लोणीकर यांसारख्या भारतीय विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवून भारतातील डिझाइन क्षेत्राला नवीन उंचीवर नेले आहे. भक्तीच्या डिझाइनची 'इंडिया डिझाइन वीक २०२५' साठी निवड होणे हे तिच्या शिक्षणाचा आणि इन्स्टिट्यूटो मरांगोनीच्या प्रशिक्षणाचा परिणाम आहे. हा इव्हेंट भारतातील डिझाइन क्षेत्रातील नवोदित आणि अनुभवी प्रतिभांना एकत्र आणतो, आणि भक्ती बबनराव लोणीकर या विद्यार्थिनीच्या यशाने या संस्थेच्या शिक्षण पद्धतीची गुणवत्ता अधोरेखित होते.

# जलस्रोतांची मर्यादा, पाणी टंचाई यामुळे शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. पाणी असेल तरच शेतीची उन्नती होते

## म्हणून पाणी आडवणे-साठवणे, तलावांचे पुनरुज्जीवन करणे काळाची गरज - डॉ .पुरुषोत्तम वायळ



**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद / प्रतिनीधी**

जाफ्राबाद तालुक्यातील डोलखेडा येथे दि ८.०५.२०२५ रोजी जलताराचे जनक श्री पुरुषोत्तम वायाळ सर यांनी डोलखेडाबु येथे पाण्यासंदर्भात पाणी अडवण्याचे तंत्र व त्याच्यापासून जमिनीची झिज न होता भूगर्भातील पाणी पातळी कशी भरवून काढता येईल यासंदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले व जास्त जमीन न गुंतवता व जमिनीतील चिभडेपणा दूर करून जल स्रोत कसा उंचावल्या जाईल आणि बारमाही ओलिताखाली सकसा जमीन कसी आनता येईल बारमाही ओली ता खाली कसे आणता येईलयाबद्दल वायाळ सर यांनी खुप मोलाचे असे मार्गदर्शन केले व शेतकऱ्यांना त्यांनी खूप अशी उदाहरणे देऊन पाण्याचे महत्व व येणाऱ्या काळात पाण्याची समस्या कशी सोडवल्या जाईल याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले व तसेच त्यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन स्वतःच्या हाताने चुना टाकून लाईन दोरी लावून जेसीबीच्या साहाय्याने गड्डे करून प्रत्यक्षात दगड टाकून दाखवले व गावकऱ्यांना प्रोत्साहित करून येणाऱ्या काळात पाणी समस्या पासून सोडवण्याचे मार्गदर्शन केले यावेळी उपस्थित तालुका कृषी अधिकारी अमोल शिंदे साहेब तसेच गावचे सुपुत्र उपजिल्हाधिकारी राष्ट्रीय महामार्ग विजय राऊत व माजी शिक्षणाधिकारी अशोक राऊत सरपंच विनोद राऊत तसेच विलास पाटील राऊत मदनराव नवले सखाराम डोळस मोठ्या संख्येने गावकरी मंडळी उपस्थित होते .

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केली जिल्हा रुग्णालयाची पाहणी









**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० मे**

बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज जिल्हा रुग्णालयाची अचानक पाहणी करत रुग्णसेवा, वैद्यकीय सुविधा आणि व्यवस्थापनाची सखोल माहिती घेतली. त्यांनी रुग्णालयातील विविध विभागांना भेट देऊन रुग्णांशी आणि कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधला.

पाहणी दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी ओपीडी, इनडोअर वॉर्ड, औषध वितरण कक्ष, ऑपरेशन थिएटर, महिला व बालरोग विभाग, तसेच प्रयोगशाळा विभागांची तपासणी केली. रुग्णांकडून उपचार, औषधे, स्वच्छता आणि कर्मचारी वर्गाच्या वागणुकीबाबत थेट माहिती घेतली. काही रुग्णांनी समाधान व्यक्त केले तर काहींनी किरकोळ अडचणी मांडल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी रुग्णालय प्रशासनाला सूचना दिल्या की, प्रत्येक रुग्णाला दर्जेदार सेवा मिळायला हवी. त्यांनी यंत्रणांमध्ये पारदर्शकता, वेळेवर उपचार आणि स्वच्छतेवर भर देण्याचे निर्देश दिले.या पाहणीत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, आरएमओ डॉ. संतोष शहाणे, बाह्य विभागाचे आरएमओ डॉ. लक्ष्मीकांत, डॉ. हनुमंत पारखे, मुख्य अधीसेविका रमा गिरी, प्राचार्य डॉ. सुवर्णा बेदरे आणि इतर विभागप्रमुख उपस्थित होते.पाहणीच्या शेवटी जिल्हाधिकाऱ्यांनी चांगली सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचे कौतुक करून त्यांना शाब्बासकी दिली. काही विभागांमध्ये तातडीने सुधारणा करण्याचे आदेशही त्यांनी दिले. जिल्हाधिकाऱ्यांच्या या पाहणीमुळे आरोग्य यंत्रणेत जागरूकता वाढणार असून, नागरिकांना अधिक चांगल्या सेवा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. रुग्णालय प्रशासनाने त्यांच्या सूचनांचे तात्काळ पालन करण्याचे आश्वासन दिले आहे.

## विष्णु महाराज आंतरकर यांचे कीर्तन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० मे**

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २७ व्या वर्षातील नववी पुण्यतिथी वैशाख शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. विष्णु महाराज आंतरकर श्रीक्षेत्र देवाची आळंदी यांचे सोमवार दिनांक १२ मे २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी जुजगव्हाण यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

## केज शहरातील गायरान धारकाला न्याय मिळावा म्हणून तहसीलदारांना निवेदन

खोट्या दस्तावेजांच्या आधारे गायरान जमीन वर्ग दोन करण्याचा प्रकार; चौकशी करून गुन्हा दाखल करण्याची मागणी

निवेदनाची दखल न घेतल्यास १९ तारखेला आमरण उपोषणाचा इशारा



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१० मे**

केज शहरातील गायरान जमिनीचा गायरान धारकाला न्याय मिळावा म्हणून आज तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. निवेदनकर्त्यांनी आरोप केला की, खोट्या दस्तावेजांचा वापर करून गायरान वर्ग एक असलेली शासकीय जमीन चुकीच्या पद्धतीने वर्ग दोन करण्यात आली आहे. या प्रकारामुळे मूळ गायरान धारकाचा अन्याय झाला आहे.

या प्रकरणात खोटे कागदपत्र तयार करून शासनाची फसवणूक करण्यात आल्यान संबंधितांवर गुन्हा दाखल करावा, तसेच जमिनीचा मूळ प्रकार पुन्हा गायरान वर्ग एक म्हणून नोंदवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, प्रशासनाने जर १८ मेपर्यंत या निवेदनाची दखल घेतली नाही आणि चौकशीची प्रक्रिया सुरू केली नाही, तर १९ मेपासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा निवेदनकर्त्यांनी दिला आहे.या प्रकाराची गांभीर्याने दखल घेऊन कारवाई करण्यात यावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत

## महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय ही संत बंकटस्वामी महाराजांची कृपा-राष्ट्रसंत भास्करगिरी महाराज देवगडकर



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० मे**

महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय ही बंकटस्वामी महाराजांची कृपा आहे. आळंदी येथील जोग महाराज यांनी स्थापन केलेल्या वारकरी शिक्षण संस्थेचा वटवृक्ष करण्याच काम स्वामी महाराज यांनी केले. असे प्रतिपादन राष्ट्रसंत शांतीब्रम्ह सद्गुरू भास्करगिरीजी महाराज देवगडकर यांनी केले. संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवास भेट दिली असता ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज, श्री ह भ प महंत किसन महाराज पवार, श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प सुरेश म जाधव यांच्यासह हजारो भाविक भक्त उपस्थित होते.

श्री क्षेत्र नेकनूर संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात श्री क्षेत्र देवगड येथील राष्ट्रसंत शांतीब्रम्ह सद्गुरू भास्करगिरीजी महाराज यांनी आशीर्वादात्मक भेट दिली यावेळी बोलताना. संत बंकटस्वामी महाराज यांच्या चरित्रातील आठवणी सांगितल्या तसेच स्वामीच्या कार्यालचा उल्लेख करताना. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय ही बंकटस्वामी महाराजांची कृपा आहे.. किर्तन कसे करावे ,भजन कसे करावे ,काकडा भजन कसा असल पाहिजे. कोणता अभंग कधी म्हणावा, मृदंग कसा वाजवावा, यासह कीर्तनाची अलिखित आचारसंहिता स्वामींनी दिली..

आदिशक्ती मुक्ताईच्या स्थळाचे संशोधन संत नामदेव महाराजांच्या अभंगाच्या माध्यमातून बंकटस्वामी महाराजांनी केले त्यामुळे आज आपल्याला मुक्ताईच्या ठिकाणाचे दर्शन करता येते..स्वामी महाराज यांनी तापी तीरावर १ महिनाभर भव्य अखंड हरिनाम सप्ताह केला तो आदर्श होता. भव्य दिव्यता आज साधन असून तेवढी होऊ शकत नाही.

जोग महाराज यांनी संस्था काढली.जोग महाराज संस्थेचा वटवृक्ष स्वामी महाराज यांनी केला.संत बंकटस्वामी महाराज यांचे भजन खूप गोड होते.

श्री क्षेत्र नेकनूर पुण्यभूमी आहे.संतांची जन्म भूमी पुण्य भूमी आहे. या बंकटस्वामी महाराजांचा संस्थानच्या भौतिक आणि अध्यात्मिक विकासात लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे खूपकार्य खूप चांगले सुरु आहे..

२०० हून अधिक गरीब गरजू मुले अध्यात्माचे धडे गिरवत आहेत एकूण समाधान वाटले.. देवगड संस्थानला भागवत कथेची सेवा करण्याचा योग आला. असे म्हणत संस्थानच्या कार्यास शुभेच्छा दिल्या. व आध्यात्मिक कार्याचा गौरव आणि कौतुक केले.

## शेतकऱ्यांचे रस्ते तात्काळ मोकळे करा:निवासी उपजिल्हाधिकारी स्वामी

## तहसील कार्यालय बीड येथे सस्ती अदालत चे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० मे**

छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी ही अभिनव योजना राबविण्याचे ठरवले आहे . छत्रपती संभाजीनगर विभागातील आठ जिल्ह्यातील विभागीय आयुक्त कार्यालयास भेट देणाऱ्या नागरिकांच्या बहुतांश तक्रारी या शेतरस्ते , पाणंद रस्ते वरील अतिक्रमण बाबत असल्याचे निदर्शनास आल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे परिपत्रककात नमूद आहे . विभागातील सर्व संबंधित नागरिकांशी थेट संवाद साधण्याकरिता वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते . त्यामधील मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी शेतरस्ते अतिक्रमण मुक्त करून देण्याच्या अनुषंगाने मागणी , महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदी , मामलेदार कोर्ट अधिनियम १९०६ मधील तरतुदी आणि वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय , परिपत्रक तसेच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे रस्त्यांबाबत



प्रलंबित प्रकरणे एका महिन्यात निकाली काढणेबाबत निर्देशाच्या अनुषंगाने विभागात शेतरस्ते / पाणंद रस्ते अतिक्रमण बाबत प्रभावी कार्यवाही करणे गरजेचे आहे , असे विभागीय आयुक्तांच्या निदर्शनास आले.

सर्वोच्च न्यायालय तसेच उच्च न्यायालय यांचेकडील निर्देशानुसार विभागस्तरावर व जिल्हास्तरावर वेळोवेळी प्रलंबित न्यायालयीन प्रकरणात तडजोड होऊन जलद गतीने प्रकरणाचा निपटारा व्हावा व सामान्य जनतेस न्याय मिळावा यासाठी वेळोवळी लोक अदालतीचे आयोजन करण्यात येते .त्याच धर्तीवर सामान्य शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते / पाणंद रस्ते मोकळे करणेकामी जलद न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी शासनाच्या सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना पंधरा दिवसातून एकदा एका ठिकाणी शक्यतो तहसिल कार्यालयात किंवा गरजेनुसार मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी सस्ती अदालत या नावाने छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्हयांमध्ये सस्ती अदालत हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.वरील उपक्रम राबविण्यासाठी तालुकास्तरीय समिती स्थापन करण्याचे निर्देश आहेत . ज्यात तहसीलदार हे अध्यक्ष असतील तर नायब तहसीलदार यांना सदस्य सचिव करण्यात आलेले आहे . इतर विभागाचे अधिकारी हे सदस्य असणार आहेत . या समितीने प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी तालुकास्तरावर सस्ती अदालत आयोजित करावे आणि शेतरस्ते / पाणंद रस्त्यावरील अतिक्रमण काढणेबाबत सर्व संबंधित शेतकरी यांचेसोबत चर्चा करून तसेच समुपदेशन करून सामंजस्याने निकाली काढणे बाबत कार्यवाही करावी असे निर्देश आहेत .

## गुरुकृपा इन्स्टिट्यूट ची यशाची परंपरा कायम

**तभा वृत्तसेवा**
**माजलागव दि.१० मे**

महाराष्ट युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ अँड सायन्स यांची हिवाळी परीक्षा २०२५ फेब्रुवारी महिन्यात पार पडली यामध्ये दरवर्षीप्रमाणे फिजिओथेरपी चा निकाल लागला आणि यावेळीही गुरुकृपा इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांनी या निकालामध्ये बाजी मारली थर्ड इयर १००%, सेकंड इयर ८०%, तर फर्स्ट इयर ६०% असा निकाल लागला या निकालामध्ये प्राविण्य मिळालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला थर्ड इयर मध्ये अनुक्रमे गौरव वसंत मोरे (प्रथम), सरस्वती संजय जगताप (द्वितीय) तसेच शामल संजय चव्हाण (तृतीय) यांनी बाजी मारली त्यांच्या पाठीवर कौतुबाबतची थाप देण्यासाठी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आबा मिश्रा मॅम तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रशांत चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ यशवंत राजेभोसले होते कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अजहर यांनी केले. यावेळी मंचावर गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी चे प्राचार्य अमित बिंदू ,पूनम कानापूरकर मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते.

## शिवसेनेने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरास देशाभिमान

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० मे**

पाकिस्तानी दहशतवाद्या विरोधात भारतीय सैन्यानी सुरु केलेल्या युद्धात शहीद भारतीय जावनाच्या शौर्याप्रति सदभावना म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी आज बीड शहरांत रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरास देशाभीम असणाऱ्या तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. विशेष म्हणजे मुस्लिम बांधवानी ही रक्तदान करून देशाप्रति सदभावना दाखवली.


याशिबिरास सह संपर्क प्रमुख बाळासाहेब अंबुरे, दैनिक झुंजार



नेता चे संपादक अजित वरपे, दैनिक सामना चे जिल्हाप्रतिनिधी उदय जोशी, जिल्हा संघटक नितीन धांडे, उपजिल्हाप्रमुख हनुमंत जगताप, कर्मवीर परिवाराचे सोमनाथ धांडे, गणेश जाधव, राहुल जामकर, नंदकुमार येवले, सुरेश तात्या शेटे, माजी नगरसेवक सुधीर भांडवले, यांनी भेट दिली. या शिबिरास उपजिल्हाप्रमुख संजय महाद्वार, लक्ष्मण बहिरवळ सुशील पिंगळे, रतन तात्या गुजर, नवनाथ प्रभाळे, सरपंच प्रदीप कोटुळे, अतुल लोणकर, योगेश वादे, अझर सय्यद, ज्ञानेश्वर दाभाडे, सुजित गिराम, गिरीश गिराम, वैभव प्रभाळे, महेश भोसले, सौरभ इंगोले यासह अनेक तरुणांनी रक्तदान शिबिरास सहभाग नोंदवला.

## सुभाष बेदमुथा यांचे संथारा व्रतात निधन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० मे**



येथील प्रसिद्ध किराणा व्यापारी सुभाषचंद चंदूलालजी बेदमुथ्था यांचे आज (दि.९) रोजी पहाटे २.३० च्या सुमारास अल्पशा आजाराने संथारा व्रतात निधन झाले. मागिल काही महिन्यांपासून ते फुफसाच्या आजाराने त्रस्त होते. मृत्यू समयी त्यांचे वय ६५ वर्षे होते.

धार्मिक वृत्तीचे, मनमिळाऊ स्वभावामुळे सुभाष बेदमुथ्था हे समाजात सुपरिचित होते. धार्मिक, सामाजिक कार्यक्रमात ते सतत पुढाकाराने सहभाग घेत असत. परंतू मागील काही दिवसांपासून ते फुफुसाच्या आजाराने त्रस्त होते. त्यांच्यावर पुणे येथील खाजगी रूग्णालयात व नंतर छ.संभाजी नगर येथील खाजगी उपचार सुरू होते. अखेर डॉक्टरांनी हात टेकल्यानंतर त्यांनी जैन धर्मातील सर्वात मोठे समजले जाणारे संथारा व्रत घेतले. त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्यावर सायंकाळी ४ च्या सुमारास मोंढा भागातील अमरधाम स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व स्तरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, दोन मुले, दोन मुली, जावई, नातु असा मोठा परिवार आहे.

## माजलगावच्या शैक्षणिक वैभवात भर

### माजलगाव येथील संस्थेस (ईगलवुड) अभियांत्रिकी महाविद्यालयाची मान्यताप्राप्त

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१० मे**

व्यंकटेश्वर मानव विकास मंडळ या संस्थेला अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद(-खउढए)कडून अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे. त्यामुळे आता माजलगावमध्येही विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी पदवी संपादन करता येणार आहे.

व्यं.मा.वि. मंडळ ही संस्था सद्या माजलगावमधील शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेली एक अग्रगण्य संस्था आहे. संस्थे अंतर्गत ईगलवुड इंग्लिश स्कूल सी.बी.एस.ई.शी संलग्न आहे. शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा अखंडित ठेवण्यात तिला यश मिळाले आहे. आग्रहास्तव संस्थेने तंत्रशिक्षणाकडे पाऊल उचलण्याचे ठरवले आणि जून २०२३ साली पॉलिटेक्निक कॉलेज सुरू करण्याची मान्यता मिळवली.ज्यातून सर्व मुलींना आणि आरक्षित प्रवर्गातील मुलांना मोफत शिक्षण उपलब्ध करून दिले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाबद्दल आस्था पाहून उच्च शिक्षण उपलब्ध करून देण्याचा मानस ठेवत या संस्थेने अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता मिळवली आणि जून २०२५ पासून हे कॉलेज विद्यार्थ्यांना प्रवेश उपलब्ध करून देत आहे.या अंतर्गत सिव्हिल इंजिनीयरिंग, कॉम्प्युटर इंजिनीयरिंग,आर्टिफिसीएल इंजिनीयरिंग, इलेक्टरीकल इंजिनीयरिंग अशा चार शाखांमध्ये प्रत्येकी साठ जागा उपलब्ध आहेत.संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अर्चना पवार, सचिव डॉ. शरद पवार, कोषाध्यक्ष डॉ. सुशील लोढा या संचालकांनी होतकरू विद्यार्थ्यांनाप्रति दूरदृष्टी ठेवत शिक्षणाचा जागर उभा केला आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव सर्व समाजस्तरातून होत आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने आ.बोंढारकरांनी घेतली आढावा बैठक

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १० मे-**

सुप्रीम कोर्टाच्या निकालामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे . त्यामुळे येत्या काही आठवड्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होणार असल्याने शिवसेनेच्या वतीने या निवडणुका ताकतीने लढण्याच्या अनुषंगाने आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय विश्रामगृह येथे नांदेड दक्षिण शिवसेनेची आढावा बैठक पार पडली.

शिवसेना पक्षप्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात शिवसेनेला मोठे बळ मिळवून देण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी , शिवसैनिकांनी , पदाधिकाऱ्यांनी जोमाने कामाला लागावे. येणाऱ्या काळात जिल्हा परिषद , पंचायत समिती , नगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घोषित होणार आहेत. नांदेड महानगरपालिकेसह नांदेड जिल्हा परिषद , पंचायत समिती, नगरपालिकांवर शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी आणि शिवसैनिकांनी कंबर कसून कामाला लागावे. राज्यात महायुतीचे सरकार असल्यामुळे पक्षाचे वरिष्ठ नेते जे धोरण ठरवतील त्या धोरणानुसार आपल्याला निवडणुकीची रणनीती ठरवायचे आहे. त्यामुळे आता ही निवडणूक कार्यकर्त्यांची असणार असल्याने प्रत्येक कार्यकर्त्यांनी आपापल्या भागात निष्ठेने कामाला लागावे. जनतेच्या प्रश्नाकडे अधिक अधिक लक्ष द्यावे . शिवसेनेची ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोहोचवावेत. मुख्यमंत्री म्हणून भाई एकनाथराव शिंदे यांनी केलेली कामे जनतेपर्यंत पुन्हा न्यावीत. लाडक्या बहिणींशी संवाद वाढवावा . लाडक्या भावांशीही संवाद वाढवावा. शेतकरी , कामगारांसह, शोषित , पिढीत , वंचितांच्या न्याय हक्कासाठी शिवसैनिकांनी आणि कार्यकर्त्यांनी पुढे यावे . याच बळावर आपल्याला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकायच्या आहेत अशा सूचनाही आ. बोंढारकर यांनी बैठकीत दिल्या आहेत . दरम्यान शिवसेनेच्या वतीने येत्या काही दिवसात आर्थिक दृष्ट्या मागास असणाऱ्या सर्वच घटकातील वधू-वरांचा सामूहिक विवाह मेळावा घेण्याचा संकल्पही यावेळी आ. बोंढारकर यांनी व्यक्त केला.या बैठकीस शिवसेना संपर्कप्रमुख दत्तात्रय पईतवार,जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे,जिल्हाप्रमुख उमेश मुंडे,मा.जिल्हा परिषद सदस्य रावसाहेब महाराज,जिल्हासंघटक शंकर पिनोजी,सहसंपर्कप्रमुख स.गुरमितसिंघ टमाना,उपजिल्हाप्रमुख बिल्लु यादव, विधानसभाप्रमुख अशोक उमरेकर,शहरप्रमुख तुलजेश यादव, शहरप्रमुख सुहास खराणे पाटील, तालुकाप्रमुख उद्धव पाटील शिंदे, तालुकाप्रमुख अशोक मोरे, युवासेना जिल्हाप्रमुख आमोदसिंघ साबळे, तालुकाप्रमुख बालाजी पाटील सपुरे, शहरप्रमुख विजय यादव,महिला आघाडी जिल्हाप्रमुख सौ.वनमालाताई राठोड,जिल्हाप्रमुख सौ.गिताताई पुरोहित,तालुकाप्रमुख सौ.स्नेहाताई पाटील,आम्रपल्वी शिंदे,अवतारसिंघ पहरेदार,लड्डू भाई,शेख सिराज,रोशनसिंघ जागीरदार, बालाजी पाटील भायेगावकर,रवी थोरात,मारुती धुमाळ,पप्पू गायकवाड,सुरेश वांगीकर,दुर्गेश बागडे,सचिन पवार,स्वराज यादव,रामेश्वर काळे,दशरथ कंधारे,कामाजी पाटील,सुदिन बागल,तुकाराम पवार,माऊली मोरे, संजय दुलधानी,गजानन गिरी,गजेंद्र ठाकूर,कृष्णा देशपांडे,दिपक पांचाळ,राजु खांडे,देवा पाटील,कुलदीप भद्रे,विक्रम बामणीकर,शंकर सिरसाठ यांच्यासह मतदारसंघातील आजी-माजी पदाधिकारी होते.




# जिल्ह्यात एफटीकेव्दारे पाणी तपासणी जनजागृती मोहीमेत सहभागी व्हावे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १० मे-**

जल जीवन मिशनअंतर्गत जिल्ह्यात ग्रामीण भागात शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी १२ मे ते ७ जून २०२५ या कालावधीत एफटीके जनजागृती अभियान राबविले जाणार आहे. या अभियानाअंतर्गत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये फिल्ड टेस्ट किट (ऋढघ) च्या वापराबाबत जनजागृती करून, नियमित पाणी तपासणीस प्रोत्साहन दिले जाणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी दिली.

जल जीवन मिशन व राष्ट्रीय पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत मान्सूनपूर्व कालावधीत जिल्ह्यातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची जैविक व रासायनिक तपासणी केली जात आहे. ही नमुना तपासणी दररोज प्रत्येक तालुक्यात करण्यात येणार असून, संबंधित माहिती केंद्र शासनाच्या पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे.

ग्रामपंचायतींमध्ये निवडलेल्या पाच महिला व शालेय विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत एफटीकेव्दारे प्रत्यक्ष पाणी तपासणीचे प्रात्यक्षिक दाखवले जाईल. नळ जोडण्या, शाळा, अंगणवाड्यांतील पाण्याचे नमुने तपासण्यात येणार आहेत. या अभियानात शिक्षण, ग्रामविकास, महिला व बालकल्याण विभाग यांचाही सक्रिय सहभाग राहणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे प्रकल्प संचालक नारायण मिसाळ, कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब व माहिती, शिक्षण व संवाद सल्लागार डॉ. नंदलाल लोकडे, जिल्हा पाणी गुणवत्ता सल्लागार कपेंद्र देसाई यांनी ग्रामस्तरावर मोठ्या प्रमाणात जनजागृती करून सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# भीषण पाणीटंचाईची ॲड. प्रतिक केराम कडून दखल

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १० मे-**



इस्लापूर शहरात अत्यंत भीषण पाणी संकट ओढावले आहे परिणामी सामान्य नागरिकात हाहाकार माजला आहे. सदर नागरिकांच्या मूलभूत सुविधा करिता आमदार भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे चिरंजीव जंगो रायताड प्रतिष्ठान किनवटचे अध्यक्ष ड. प्रतीक भिमराव केराम यांनी तात्काळ दखल घेतली आणि नवीन टँकरची निर्मिती स्व खर्चातून करून इस्लापूर शहरातील जनतेला समर्पित केले या लोकोपयोगी कार्याबद्दलजनतेतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे

इस्लापूर येथील इच्छापूर्ती गणेश मंदिर येथे पाण्याच्या टँकर चे लोकार्पण किनवट दक्षिणचे तालुका अध्यक्ष सूर्यकांत आरंडकर यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी पंचायत समिती किनवट चे माजी उपसभापती कपिल करेवार, मा सरपंच श्रीरंग पवार, भाजपा जिल्हा सचिव काशिनाथ शिंदे, नारायण शिनगारे, रमेश बोड्डेवाड, कपिल बंकलवाड, बालाजी पळसपुरे, भवरे, प्रकाश दंडे, विकास माहुरकर, शेख लतीफ, सिताराम माने, शिवशंकर मेळेगावकर, स्वप्निल गरडे, ओम कदम, पत्रकार गौतम कांबळे, ईश्वर जाधव, मारोती शेळके यांच्यासह परिसरातील असंख्य नागरिक उपस्थित होते

# वीर जवान सचिन वनंजे यांना खा. रवींद्र चव्हाण यांची मानवंदना



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १० मे-**

काश्मीर येथे देशसेवा बजावत असताना शहीद झालेले जवान देगलूर तालुक्याचे *भूमिपुत्र सचिन यादवराव वनंजे* यांच्या पार्थिवाचे दर्शन घेऊन खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी पुष्पचक्र अर्पण केले व भारत मातेच्या या वीर सुपुत्राला मानवंदना दिली.

यावेळी लोहा कंधार मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, देगलूर मतदारसंघाचे आमदार जितेश अंतापुरकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस उपाधीक्षक गोसावी यांच्यासह देगलूर प्रशासनातील अधिकारी, काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळ वाटप

**नायगाव**-वंचित बहुजन महाविकास आघाडीचे ॲड. बाळासाहेब आंबेडकरांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भारतीय बौद्ध महासभा तथा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने नायगांव येथील ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळे वाटप करण्यात आले. राज्यातील वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांचा दि.१० मे ५ रोजी वाढदिवसाचेऔचित्य साधून. सध्या भारतीय देशांत नुकतेच पाकिस्तान दहशतवाद्यांनी भारतीय देशा तील नागरिक काही पर्यटक नव दाम्पत्यांना जात विच्यारुन त्यांच्यावर अमानुषपणे अंदाधुंद गोळीबार करीत पहलगाम हल्ला घडवून आणला असुन. ह्या हल्ल्यामध्ये जवळ पास २५ते३० भारतीय नागरिकांना प्राणास मुकावे लागले आहे. ह्या घटनेच्या निषेधार्थ सध्या भारतीय देशाने पाकिस्तानातील जैश ए मोहम्मद, या सारख्या संघटनेतील दहशत वाद्यांची पाळे मुळे नष्ट करण्यासा ठी ऑपरेशन सिंदूरने सुरुवात केली असुन. त्यातच आज दि.१० मे रोजी राज्यातील वंचित बहुजन आघाडी चे सर्वेसर्वाॲड. बाळासाहेब आंबेडकरांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून. यावेळी कुठल्याही प्रकारचा आनंदोत्सव न साजरा करता यावेळी भारतीय बौद्ध महासभा तथा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सकाळ पासूनच नायगांव येथील ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळे वाटप करण्यात आले आहे तर.तद्नंतर ऑपरेशन सिंदूर मधील भारतीय देशातील जवानांचे मनोबल उंचविण्यासाठी रविवारी सकाळी भारतीय बौद्ध महासभा शाखा नायगांव तालुका अध्यक्ष अनिल गायकांबळे संरक्षण उपाध्यक्ष गौतम जोंधळे, संरक्षण सचिव संजय गायकवाड,संरक्षण उपाध्यक्ष शशिकांत सोनसाळे, समता सैनिक रवी हणमंते , गंगासागरे गौतम भेदेकर,भीमाबाई वाघमारे व अनेक वंचित बहुजन आघाडीतील कट्टर समर्थकासह तिरंगा ध्वज हातात घेऊन भव्य दिव्य महारॅली सुरुवात नायगाव येथील जुन्या तहसील पासून हेडगेवार चौक, शिवाजी चौक, अण्णाभाऊ साठे चौका पासून ते महामानव डॉ.बाबासाहेबआंबेडकर चौक येथे तिरंगा ध्वज रॅलीची सांगता होणार असुन.यावेळी हजारोच्या संख्येने नागरिक उपस्थित रहावे असे आव्हान वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष साहेबराव कोपरेकर ,उपाध्यक्ष सतीश वाघमारे,सचिव विलास वाघमारे, उपाध्यक्ष प्रभाकर घंटेवाड, धम्मानंद जोंधळे, बळी भदरगे, राहुल गायकवाड, सिदोधन लांडगे, बाळासाहेब सोनकांबळे, धम्मानंद रातोळीकर आदी केले आहे.

### सुधाकरभाऊ पांढरे मित्रमंडळाच्यावतीने बुद्ध जयंतीनिमित्त खिर व अन्नदान कार्यक्रम

**नांदेड**-तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५६९ व्या जयंती महोत्सवानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसर येथे दि. १२ मे २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता खिर व अन्नदान कार्यक्रमाचे आयोजन सुधाकरभाऊ पांढरे मित्रमंडळाच्यावतीने करण्यात आले आहे. सुधाकरभाऊ मित्रमंडळाच्यावतीने दरवर्षी या कार्यक्रमाचे आयोजन केले जात असून हे १४ वे वर्ष आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन इतवारा पोलीस उपविभागीय अधिकारी सुशिलकुमार नायक यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिपाइंचे राज्य संघटक विजय सोनवणे हे राहणार आहेत. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुधाकरराव पांढरे हे उपस्थित राहणार आहेत. स्वागताध्यक्ष रिपाइंचे मराठवाडा उपाध्यक्ष सुखदेव चिखलीकर यांची उपस्थिती राहणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून सागर तायडे कार्यकारी (अभियंता, राष्ट्रीय महामार्ग), विनोद गुंडमवार (तहसिलदार, भोकर), मकरंद दिवाकर (नायब तहसिलदार, जिल्हाधिकारी कार्यालय,नांदेड), अमोल आव्हाड (आर.टी.ओ., नांदेड), रावण सोनसळे (सहाय्यक जायुक्त, इतवारा झोन), मिलींद लाठकर, ऍड. रवि भारती (मागरा कन्स्ट्रक्शन संचालक), परिक्षीत मुळे पाटील मायरा, ऍड. अमित डोईफोडे, ऍड. नितीन कागणे (माजी सचिव, अभिवक्ता संघ), ऍड. गिरीष मोरे,अतुलसिंह ठाकुर (इलेक्ट्रीक कॉन्ट्राक्टर), अनिल पाटील बोरगांवकर (युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष, भाजपा), सुमेध बनसोडे (जनसंपर्क अधिकारी, मनपा, नांदेड), नागराज सुलगेकर,प्रफुल सावंत (प्रदेश उपाध्यक्ष, अनुसूचित विभाग), सुभाष काटकांबळे (सामाजिक कार्यकर्ते), गणेश शिंगे (मनपा कर्मचारी युनियन अध्यक्ष), विजय गोडबोले, नंदकुमार बनसोडे, अविनाश पाटील (पत्रकार, नांदेड), सुरेश हाटकर, डि.पी. गायकवाड, यशवंत थोरात, डॉ. कपिल कुतर्डीकर, महेश चालिकवार, रमेश गोडबोले, बाळु राऊत, संजय कौठेकर,विठ्ठल उकरंडे आदींची उपस्थिती राहणार आहे. तरी या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन राहुल वाघमारे, प्रशांत पोपशेटवार, सुशांत जोंधळे आदींनी केले आहे.

# यंदा कुसुम सभागृहात रंगणार बुद्ध पहाट कार्यक्रम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १० मे-**

तथागत भगवान बुध्दांच्या २५८८ व्या जयंती निमित्त महाराष्ट्र बहुजन शिक्षक महासंघ, नांदेडच्यावतीने दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी येत्या सोमवार दि.१२ मे रोजी अर्थात बुध्द पौर्णिमेच्या दिवशी सकाळी पाच वाजता शहरातील कुसुम सभागृह येथे सुप्रसिध्द गायक चेतनकुमार चोपडे प्रस्तुत् तुझ्या पाऊल खुणा भीमराया या बुध्द भिम गीत गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

तथागताच्या धम्माचे चक्र गतीमान करण्यासाठी भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र बहुजन शिक्षक महासंघ, नांदेडच्यावतीने मागील १६ वर्षांपासून वैशाख पौर्णिमेला बुध्द पहाट या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार यावर्षी कुसुम सभागृह येथे आयोजित करण्यात आलेल्या बुध्द पहाट या संगीतमय कार्यक्रमाच्या प्रारंभी पुज्य भदंत पय्याबोधी थेरो यांचा धम्मदेशनाचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध गायक चेतनकुमार चोपडे आणि त्यांचा संच प्रस्तुत् तुझ्या पाऊल खुणा भीमराया या बुध्द भिम गीत गायनाचे सादरीकरण करण्यात येणार आहे. तरी बौद्ध उपासक आणि उपासिकांनी पांढरा शुभ्र पोशाख परिधान करून उपस्थित राहून कुशल कर्म संपादित करावे, असे आवाहन संयोजक रोहिदास कांबळे आणि टी. पी.वाघमारे यांनी केले आहे.

तसेच या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजन समितीचे अध्यक्ष आर.बी.मादळे, उपाध्यक्ष सा.ना.भालेराव, मिलींद गायकवाड, बी.आर. धनजकर,

सचिव वसंत सोनकांबळे, यशवंत कांबळे,सहसचिव विद्याधर घायाळ सल्लागार ॲड. अशोक देवकरे, इंजि.भरत कांनिदे, दिगांबर मोरे,बी.एम.मल्हारे,गौतम कांबळे, एन.जी.कांबळे, जी.पी.मिसाळे,देविदास ढवळे, डॉ. हेमंत कार्ले, इंजि. वसंत वीर, वैजनाथ वानखेडे, प्रा.जे.टी.जाधव,आर.डी. सिंदगीकर,एम.जी. भालेराव,नागोराव डोंगरे,

अनंत शिकारेकर, अरूण केसराळीकर, साहेबराव हैबते, दिलीप हनुमंते, मारोतराव धुतुरे, प्रा. शुध्दोधन गायकवाड, एल. जी. वाघमारे, संजय सोनकांबळे, बी. एस. गजले, प्रसिध्दी प्रमुख राम तरटे, नंदकुमार कांबळे, माधव गोधणे, जयवर्धन भोसीकर, कुलदिप नंदुरकर, संजय कदम आदि परिश्रम घेत आहेत.

# व्यंकटी बाबा हनमंते इज्जतगांवकर यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १० मे-**



तालुक्यातील मौजे इज्जतगाव येथिल आंबेडकरी चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ते व्यंकटी बाबा हनमंते यांचे दिनांक १० मे २०२५ रोज शनिवार पहाटे ठिक ५:०० वाजता दुःखद निधन झाले आहे. मृत्यू समयी त्यांचे वय ५१ वर्ष होते .त्यांचा अंत्यसंस्कार विधी दिनांक १० मे रोजीच शनिवारी दुपारी ठिक ४:०० वाजता इज्जतगांव येथे बुध्द स्मशान भुमित करण्यात आला आहे . उमरी तालुक्याचे आंबेडकर चळवळी नेते तथा पत्रकार डी जी तुपसाखरे यांचे मामा तर सोपान डोंगरे बितनाळकर यांचे ते मेहूणे होत .

# जल जिवन कामाची चौकशी करावी: शेख साबेर

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि. १० मे-**

नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर तालुक्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायत निहाय जल जिवन मिशन योजने अंतर्गत शासनाने करोडो रुपयांचा निधी देवून सुध्दा ही कामे पुर्ण न करता अर्धवट कामे करुन ग्रामीण भागामधील नळाला पाणी येण्या अगोदरच अर्धवट पाईपलाईन करुन कामे पुर्णतः झाल्याचे कागदोपत्री दाखवून गुत्तेदार व अधिकारी यांनी संगनमत करुन शासनाच्या करोडो रुपयांचा अपहार, भ्रष्टाचार केल्या प्रकरणी अर्धापूर तालुक्यातील जल जिवन मिशन योजनेची चौकशी करण्या करीता चार सदस्यीय चौकशी समिती गठीत करुन शासकीय निधीचा कागदोपत्री कामे पूर्ण झाल्याचे दाखवून भ्रष्टाचार करणारे गुत्तेदार व अधिकारी यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नांदेड जिल्हा ग्रामीण अल्पसंख्याक विभाग जिल्हाध्यक्ष शेख साबेर शेख सगिर यांनी दिनांक १५ एप्रिल २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार जिल्हाधिकारी नांदेड मुख्य अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांच्या कडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली होती.पंचायत समिती अर्धापूर यांनी त्वरित या तक्रारीची दाखल घेत

दिनांक ३० एप्रिल रोजी पंचायत समिती अर्धापूर गट विकास अधिकारी यांनी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जल जीवन मिशन च्या कामाची तात्काळ चौकशी करावी असे आदेश व्ही एम मुंडकर,मेघना चौधरी,अब्दुल कादर,पूनम बिराजदार,राजेश जाधव याना पत्राद्वारे काढण्यात आले आहे.

# सोयाबीनच्या पैशासाठी शेतकऱ्यांचा अमर उपोषनाचा इशारा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १० मे-**

हदगाव तालुक्यातील डोंगरगाव येथील शेतकरी यादव सुकापुरे यांनी महाराष्ट्र शासनाचा सोयाबीन खरेदी करण्याची जे निर्देश दिले होते त्या निर्देशाच्या नियमानुसार संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन करून शेतकरी यादव सुकापुरे यांचा सोयाबीन देण्याचा ऑनलाईन नंबर आला व ६ फेब्रुवारी रोजी आपल्या शेतातील सोयाबीन हदगाव तालुक्यातील खरेदी विक्री संघ केंद्रावर १८ क्विंटल पाचशे सोयाबीन दिले व त्याला सर्व कागदपत्रे लागणारे आधार बँकेचे पासबुक खरेदी-विक्री संघाचे कर्मचारी यांच्याकडे सुपूर्द केले पण आज १० मे पर्यंत त्यांच्या खात्यावर १८ क्विंटल ५०० सोयाबीनची रक्कम ९२ हजार रुपये ही रक्कम पंधरा दिवसाच्या आत जमा व्हायला पाहिजे होती पण ती आजपर्यंत जमा झाली नाही. खरेदी विक्री संघाचे अधिकाऱ्यांशी वारंवार चर्चा करून सुद्धा व नांदेड येथील डी. एम. ओ. यांच्यासोबत सुद्धा भ्रमणध्वनीवरून चर्चा करून सुद्धा आज- उद्या करत या शेतकऱ्यावर अखेर तहसील कार्यालयासमोर अमरण उपोषणाची बसण्याची वेळ या अधिकाऱ्यांनी आणली.

# रुद्र पाटील यांनी अमेरिकेत घेतली विशेष प्राविण्यासह एम.एस.मास्टर डिग्री

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १० मे-**



रुद्र राजश्री हेमंत पाटील यांनी अमेरिकेतील न्यूयॉर्क येथील सेक्रेड हार्ट युनिव्हर्सिटी मधून मास्टर ऑफ सायन्स,इन फायनांस अँड इन्व्हेस्टमेंट मॅनेजमेंटच्या दोन वर्षाच्या कोर्समध्ये विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले असून त्यांना मान्यवरांच्या हस्ते एम.एस.डिग्री प्रदान करण्यात आली.

रुद्र पाटील हे नामदार हेमंत पाटील व सामाजिक कार्यकर्त्या तथा गोदावरी उद्योग समूहाच्या अध्यक्ष राजश्री पाटील यांचे सुपुत्र आहेत. हा पदवीदान समारंभ सोहळा नुकताच अमेरिकेत संपन्न झाला असून या सोहळ्यास रूद्रचे आई वडील राजश्री पाटील व हेमंत पाटील हे मुलाचा कौतुक सोहळा पाहण्यासाठी विशेष करून उपस्थित होते.

हेमंत पाटील व राजश्री पाटील हे सर्व सामान्य कुटुंबातून आलेले जोडप असून सेवा संघाच्या माध्यमातून दोघांच्याही सामाजिक कार्याची सुरवात एकदाच झाली.मूळ सामाजिक पिंड असलेले ही जोडी पुढे राजकारणात आली आणि शिवसेनेच्या माध्यमातून आजतागायत यशस्वीपणे राजकारण आणि समाजकारण करीत आहेत.

# आकांक्षा लुंगारेची वार्षिक ५ लाख पॅकेजसाठी निवड

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि. १० मे-**



येथील आनंद दत्तधाम मठाचे मठाधिपती ज्यांची नुकतीच राज्य सरकारने महाराष्ट्र शासनाचे स्च्छता दूत म्हणून नियुक्ती केलेली आहे त्याच सुप्रसिद्ध आश्रमाचे सरव्यवस्थापक तथा प्रवक्ते प्रतिष्ठित नागरिक भाऊ पाटील हडसणीकर यांची नात य व त मा ळ येथील पी.वाधवाणी फार्मसी महाविद्यालयातील एम. फार्म फार्माकोलॉजी या अभ्यासक्रमातील विद्यार्थिनी आकांक्षा गंगाधर लुंगारे हिची सायनोस हेल्थ प्रा. लिमिटेड, पुणे येथे निवड झाली आहे. तिला पाच लाखांचे वार्षिक पॅकेज मिळाले आहे. या यशाबद्दल तीचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या डिजिटल स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना नोकरी मिळणे अतिशय कठीण झाले आहे. परंतु पी. वाधवाणी फार्मसी महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी सतत प्रयत्नशील असते. महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी विविध नामांकित कंपनीचे प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात येते. यंदा आयोजित प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये कॉलेजची आकांक्षा लुंगारे हिची नामांकित कंपनीत निवड झाली आहे. या यशासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल चांदेवार यांच्या मार्गदर्शनात प्लेसमेंट सेलप्रमुख प्रा. परेश वाधवाणी, फार्माकोलॉजी विभाग प्रमुख डॉ. नितीन कोचर, संशोधक मार्गदर्शक डॉ. अभिजीत श्रीराव व डॉ. दीपक मोहाळे यांनी मार्गदर्शन केले.

विशेष म्हणजे यशस्विता आकांधा पाटील ही माहूर येथील आनंद दत्तधाम मठाचे मठाधिपती तथा महाराष्ट्र शासनाचे स्च्छता दूत साईनाथ महाराज यांचे मुळ गाव बितनाळ ता. भोकर जिल्हा नांदेड येथील येथील रहिवासी असून, माहूर येथील आपले आजोबा भाऊ पाटील हडसणीकर यांच्या कडे राहत असताना तिला साईनाथ महाराज यांच्या उपक्रमशिलतेतून आनंद दत्तधाम मठाच्या वतीने वेळोवेळी आयोजित करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण अशा शिक्षण परिषदेचा अभ्यासासाठी मोठा लाभ झाला असल्याचे तीने सांगितले आहे.माझे पालक, आजोबा व गुरुवर्य साईनाथ महाराज यांच्या आशीर्वादाने व सर्व शिक्षकवर्ग यांच्या मार्गदर्शनाने हे यश मिळाले असल्याचे सांगत सर्वांचे आभार तीने मानले आहेत.

# देगलूर अवैध रेती उत्खनन प्रकरण मनसे तालुकाध्यक्ष परबते यांचे विष प्राशन

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १० मे-**

देगलूर तालुका महाराष्ट्र नवनिर्माण सेना तालुकाध्यक्ष मन्मथ परबते यांनी तालुक्यामध्ये होत असलेले अवैध रेती उत्खनन व वाहतूक या विरोधात तक्रार देऊनही मंडळ अधिकारी व पोलीस प्रशासनाने रेती माफियांना अभय दिले आहे. या संबंधितांकडून त्यांना वारंवार जीवे मारण्याची धमकी देण्यात येत असल्यामुळे त्यांनी त्रस्त होऊन देगलूर पोलीस ठाण्यासमोर विषारी औषध प्राशन केले. त्यांना नांदेड शहरातील ग्लोबल हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले आहे. संबंधितांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करावा असा जवाब परबते यांनी शिवाजीनगर पोलिसांना दिला आहे.

देगलूर तालुक्यातील गौण खनिज लिपिक हनुमंत नकुलवार व शहापूर मंडळ अधिकारी बालाजी पुष्पलवार हे हदुपार रेती माफिया शेख जुनैद यांना रेती उत्खनन व वाहतुकीसाठी मदत व प्रोत्साहन देतात याबाबत मनसे तालुकाध्यक्ष मन्मथ परबते यांनी वारंवार तक्रारी देऊन पाठपुरावा केला आहे. याचा राग मनात धरून या सर्वांनी परबते यांना मानसिक त्रास देऊन वारंवार जीवे मारण्याचा धमक्या दिल्या व प्रयत्नही केला आहे. त्यांच्या त्रासाला कंटाळून परबते यांनी देगलूर पोलीस ठाण्यासमोर दि. ७ मे २०२५ रोजी विषारी औषध प्राशन केले त्यांना नांदेड शहरातील ग्लोबल हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती आता स्थिर आहे .

याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून मंडळ अधिकारी बालाजी पुष्पलवार, गौण खनिज लिपिक हनुमंत नकुलवार व पोलीस कर्मचारी यांनी दमदाटी करून रेतीमाफीया शेख जुनैद यांना अभय देण्याचे काम केल्याचा आरोप शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे मनसे तालुकाध्यक्ष मन्मथ परबते यांनी दिलेल्या जबाब केला आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांचे पोलीस प्रशासन आता अवैध रेती उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर काय कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.